दिवाळी विशेषांक २०२५

# सेवक वार्ता

ऑक्टोबर-२०२५

वर्ष -६ अंक-१२

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र

## दीपावली शुभचिंतन



चित्रकार एस एल हळदणकर

दीपावली शुभेच्छा -

आले प्रसंग सुख-आनंदाचे,उन्मात नको मजला ।
आले संकट दुःख-कष्टांचे,शक्ती दे मजला पेलण्याचे ।।
सुख-आनंद,दुःख-कष्ट,क्षणयीक कालांचे ।
ईश्वर नामाचा घोष,अनंत कालांचे ।।
तव नामाची भूक लागता,तना-मनाला तृप्ती ।
ध्यास भक्तीचा देईल,सुख-दुःखापासून मुक्ती ।।
ईश्वर चरणी,प्रार्थना मी करितो ।
सगळ्यांना दीपावली जावो,सुख-शांती,भरभराटीची ।

शुभेच्छुक:वि.त्र्यं.पत्की

## सेवकची वाटचाल वार्ता ....

### कै.माधवराव गोगटे स्मृती व्याख्यान संपन्न

पुणे दि.९ आक्टो. : कै. माधवराव गोगटे स्मृती व्याख्यान माला,२०२५ चे पुष्प आज रोजी, वनभवन पुणे येथे श्री. नितीन काकोडकर, सेवानिवृत्त प्रधान मुख्य वन संरक्षक, म. रा. यांनी गुंफले. श्री. विश्वास सावरकर, सेवकचे अध्यक्ष यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. या कार्यक्रमास मोहन खेडकर, अ.ना.बल्लाळ, अ.बा.भांगरे, अरविंद आपटे, रवी वानखडे व इतर अनेक ज्येष्ठ सेवानिवृत्त वनाधिकारी यांनी आवर्जून उपस्थित राहून शोभा वाढविली,

तसेच सौ.काकोडकर, विलासराव गोगटे, डॉ. परिक्षीत गोगटे, श्री.आशिष ठाकरे. वन संरक्षक, पुणे वन वृत्त, व सुमारे ५० सज्जन या कार्यक्रमास उपस्थित होते.

श्री.मदन कुलकर्णी, सेवकचे कार्यकारी अध्यक्ष यांनी सुरुवातीस वक्ते व प्रमुख उपस्थितांचे स्वागत करुन, प्रास्ताविक केले. या व्याख्यानमालेची वाटचालीचाआढावा घेऊन त्यांनी श्री. नितीन काकोडकर यांची ओळख उपस्थितांना करुन दिली.

श्री. वि. त्र्यं. पत्की यांनी पुढील दिवंगत वनाधिकारी यांच्या कामाची माहिती देऊन, त्यांना सामुहीक श्रध्दांजली प्रस्ताव मांडला आणि सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रद्धांजली अर्पण केली!

१. पद्मश्री कै. चित्तमपल्ली.
२.कै.चाफेकर
३.कै. वसंतराव जोशी
४.कै. एम. एस.नाईक.

त्यानंतर, वक्ते, श्री काकोडकर यांनी पी.पी.टी.द्वारे वन्यजीव व्यवस्थापनातील विविध पैलूंचा आढावा घेऊन, भारतातील प्रमुख प्रजातींचे संरक्षण, संघर्ष, व्यवस्थापन, संवर्धन, इको टूरीझमची व्याप्ती, त्याद्वारे विकास यावर भाष्य केले.

आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते नितीन काकोडकर यांनी अतिशय बोधप्रद, माहितीपूर्ण सादरीकरण हलक्या फुलक्या वातावरणात सादर केले. प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमात मान्यवर बल्लाळ, खेडकर, भांगरे यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर काकोडकर, सावरकर यांनी समाधानकारक खुलासे केले.

उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करुन त्यावर चर्चा घडवून आणली. श्री. सावरकर यांनी अध्यक्षीय समारोपाचे विचार व्यक्त केले.

श्री. वि. त्र्यं. पत्की लिखित "वन सान्निध्याची साठी" या पुस्तकांचे वितरण करण्यात आले. चहापान होऊन कार्यक्रम संपला.

निवेदन आणि सुत्र संचालन सचिव मदन कुलकर्णी यांनी केले आणि प्रकाश कुकडोलकर यांनी आभार प्रदर्शन केले.


व्याख्यान माला कार्यक्रमाचे नियोजन, मार्गदर्शन, चर्चा आणि उपस्थिती अशा सर्वच अंगांनी उत्तम झाला. आयोजित करणाऱ्या सर्व टीमचे अभिनंदन.












## कोलामार्का वन संवर्धन राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करून सादर

महाराष्ट्रातील रानम्हशींचे एकमेव वास्तव्याचे कोलमार्क हे क्षेत्र छत्तीसगड व महाराष्ट्र यांचे सीमेवर असून सिरोंचा वन विभागाच्या अंतर्गत आहे.सदर क्षेत्रास वनसंवर्धन राखीव क्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. १८०.७२ चौ. किमी क्षेत्र असलेल्या कोलमार्क वन संवर्धन राखीव क्षेत्राचा व्यवस्थापन आराखडा तयार करण्याचे काम सेवक संघास देण्यात आले होते.

त्यानुसार २०२४ ते २०३४ या १० वर्षासाठीचा व्यवस्थापन आराखडा केंद्र सरकारने ऑक्टोबर २०२१ नुसार जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार तयार करून मा. प्रधान मुख्य वन संरक्षक वन्यजीव, नागपूर यांना नुकताच सादर करण्यात आला आहे.

आराखडा तयार करणेकामी खालील सेवक सदस्यांचे बहुमोल मार्गदर्शन प्राप्त झाले.

१) श्री. व्ही. बी. सावरकर (चमू प्रमुख)
२) श्री. व्ही टि पत्की (समन्वयक)
३) श्री. पी. के. कुळकर्णी (सदस्य)
४) श्री. विजय खनके (सदस्य)
५) श्री. वसंत कामडी (सदस्य)

## सेवक संघातर्फे वन्यजीव सप्ताह आगळ्या-वेगळ्या पध्दतीने साजरा

पुणे येथे फेब्रुवारी २५ मध्ये सर्व साधारण सभेत निसर्ग संवर्धन आणि पर्यावरणरक्षण याविषयी समाजात जागृती करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक सभागृहात चांगल्या दर्जाचे माहितीफलक लावणे, दरवर्षी निवडक १० - १२ शाळांना या विषयांसंबंधीचे पुस्तकांचे संच वाटप करण्यात यावेत, समाजातील उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांची निवड करून त्यांना प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करावे असा श्री गवळी यांनी मांडला होता. तो सदर प्रस्ताव मान्य करण्यात आला होता. त्यानुसार वृत्तस्तरावरील शाखांमार्फत अशा व्यक्ती व संस्थांची निवड करण्यात यावी असे ठरले होते. त्यास अनुसरुन विविध प्रकारे आवाहन करुन शाळांच्या नावाचे प्रस्ताव मागविले असता खालील ३ शाळांच्या नावाचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

१.जि.प. माध्यमिक शाळा, पालडोह, ता. जिवती,जि.चंद्रपूर
२. जि.प. प्राथमिक शाळा, बारीपाडा, ता. साक्री, जि. धुळे
३. जि.प. प्राथमिक शाळा,हिवाळे, ता. पेठ, जि. नाशिक

वर ठरल्याप्रमाणे नुकत्याच झालेल्या वन्यजीव सप्ताहात तीन शाळांना निसर्ग, वने, वन्यजीव, संवर्धन व इतर पुस्तके खरेदी करून ती धुळे, चंद्रपूर व नाशिक येथे पाठवली होती. त्यांचे मूल्य साधारण रु.५००० प्रति शाळा असून याप्रमाणे पुस्तके होत. ही श्री मारुती चितमपल्ली यांनी लिहिलेली पुस्तके आहेत

१. जंगलाचं देणं
२. निसर्ग वाचन
३. रानवाटा
४. केशराचा पाऊस
५. नवेगाव बांधचे दिवस
६. रातवा
७. चैत्र पालवी

८. सुवर्ण गरुड
९. पक्षी जाई दिगंतरा
१०. पाखरमाया
११. घरट्यापलिकडे
१२. शब्दांचे घन
१३. आनंददायी बगळे
१४. निळावंती
१५. जंगलाची दुनिया

---

## सेवक संघातर्फे यांनी वन , वन्यजीव, पर्यावरण, संवर्धन, कार्याचा अध्यात्मिक माध्यमातून प्रचार आणि प्रसाराबद्दल सदस्यांचा सत्कार

चाळीसगाव, दि. १ ऑक्टों.: सेवक संघ धुळे आज रोजी चाळीसगाव येथे ह. भ. प. श्री बाळकृष्ण छलारे महाराज आणि त्यांचे सहकारी श्री जी.के. निकम सेवानिवृत्त वपअ यांनी वन आणि पर्यावरण,वन्यजीव संवर्धन, संरक्षण या कार्याचा प्रचार आणि प्रसार भजन,किर्तन, पंढरपुर वारी अशा अध्यात्मिक माध्यमातून केल्याबद्दल त्यांचा मानपत्र,श्रीफळ देऊन वन्यजीव सप्ताहाचे प्रथम दिवशी चाळीसगाव येथे सत्कार करण्यात आला.
त्याप्रसंगी जळगांव,चाळीसगाव आणि धुळे येथील अनेक मान्यवर सभासद कार्यक्रमास उपस्थि होते. सकाळी चाळीसगाव रेस्ट हाऊस वर कार्यक्रम संपन्न झाला.
चहा,नाश्ता व्यवस्था याची सोय चाळीसगाव येथे केली होती. चाळीसगाव येथील सर्व मान्यवर उपस्थित होत्या.

## सेवक संघातर्फे पालडोह शाळेस पुस्तकांचा संच भेट

चंद्रपूर दि. १ ऑक्टोबर: मा. राष्ट्रपती, भारत, यांच्या पुरस्कारास महाराष्ट्र राज्यातील फक्त दोनच शासकीय माध्यमिक शाळा पात्र ठरल्या होत्या. त्यापैकी चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील मौजा पालडोह येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळा ही एक आहे. ही शाळा जिवती तालुक्यात दुर्गम भागात महाराष्ट्र-तेलंगना राज्याच्या सिमेवर आहे. ही शाळा वर्षातून ३६५ दिवस सुरू असते हे वैशिष्ट्य. शाळा व्यवस्थापन उत्कृष्ट असून शिस्तबद्ध आहे. यात प्रामुख्याने मुख्याध्यापकाचे व शिक्षकांचे योगदान खुप आहे. जागतिक वन दिन सप्ताहाच्या प्रथम दिनी सेवक संघ चंद्रपूर शाखेचे सभासद खनके, पंधरे, बत्तुलवार यांनी पालडोहला भेट दिली. शाळेतील मुख्याध्यापक,शिक्षकगण व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विध्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी, त्यांना वने व वन्यजीवांची ओळख व्हावी,महत्व कळावे यासाठी मा.मारुती चितमपल्ली लिखीत पंधरा पुस्तकांचा संच मुख्याध्यापकास दिला.





## सेवक संघातर्फे बारीपाडा शाळेस पुस्तकांचा संच भेट

धुळे, दि.३ ऑक्टोबर: बारीपाडा परिसरात अतिवृष्टीमुळे बारीपाडा येथे जाण्याचा रस्ता खूप खराब असल्याचे कळालेने व रस्ते वाहतूक बंद झाल्याने हा कार्यक्रम धुळे येथे आयोजित केला होता. नियोजित कार्यक्रमासाठी बारीपाडा येथे जाता न आल्याने पद्मश्री पुरस्कार विजेते श्री. चैत्राम पवार यांचे प्रस्तावानुसार सेवक संघाच्या पदाधिकारी व सदस्य यांनी वन्यजीव सप्ताहानिमित्त कार्यक्रमाची शृंखला पुढे नेत आज, देव गिरी कल्याण आश्रम कन्या छात्रालय, धुळे येथील वनवासी कल्याण आश्रमाला भेट दिली व सेवक संघातर्फे पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या १५ पुस्तकांचा संच भेट दिला.याप्रसंगी जेष्ठ सदस्य एन. एम. निकुमे, पी.एच. वाघ, एस.के. गवळी,जे. ए. पाटील व व्ही. पी. पवार हे उपस्थित होते.
ही पुस्तके पुढे बारीपाडा शाळेत हस्तांतरित करण्यात येतील.





# सेवक संघाने वन्यजीव व वन पर्यटन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या वन रक्षकांना केले सन्मानित

चंद्रपूर दि. ७ ऑक्टोबर: वन्यजीव सप्ताहाच्या शेवटच्या दिवसाच्या सांगता प्रसंगी सेवक संघातर्फे वन्यजीव व वन पर्यटन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणारे वनरक्षक श्री अरविंद बडगे, नवेगाव नागझिरा राष्ट्रीय उद्यान व श्री बालाजी भिंगेवाड माणिकगड पर्यटन स्थळ, मध्य चांदा वन विभाग यांचा सन्मानपत्र, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन चंद्रपूर येथे सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी श्री. गुरुराज GIS expert व श्री.पी. एच. झाडे सेनि सवसं हे उपस्थित होते.



## "वन सान्निध्याची साठी" या पुस्तकाची धुळे येथील शासकीय जिल्हा ग्रंथालयास भेट

धुळे, दि.३ ऑक्टोबर: वन्यजीव सप्ताहाच्या कार्यक्रमाची शृंखला पुढे नेत धुळे शाखेच्या सदस्यांनी एकत्र येत श्री. पत्की सरांचे "वन सान्निध्याची साठी" या पुस्तकाची एक प्रत धुळे शहराचे वैभव ठरणारे येथील शासकीय ग्रंथालयास भेट दिली. याप्रसंगी जेष्ठ सदस्य एन. एम. निकुमे, पी.एच. वाघ, एस.के. गवळी,जे. ए. पाटील व व्ही. पी. पवार हे उपस्थित होते.








# दिवाळी लेख

## दिवाळीच्या परंपरा...

### कारिट फोडल्याने काय होते ?????

श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला. नरकासुर हा फक्त राक्षस नाही तर कधीही नष्ट न होणारी अघोरी, दुष्ट वैचारिक शक्ती. अर्थात कोकणात हा दिवस 'चावदीस' म्हणून साजरा करतात. पण अभ्यंगस्नानानंतर किंवा स्नानापूर्वी 'कारिट' का फोडलं जातं, हा प्रश्न आजच्या तरूणांनी विचारला तर त्यात वावगे नाही. महाराष्ट्रात सर्वच ठिकाणी ही परंपरा नाही. तुळशीवृंदावनासमोर दिवाळीच्या पहिल्यादिवशी म्हणजे नरकासुराचा वध केल्यानंतर येणारी सकाळ...या दिवशी 'कारिट' फोडण्याची प्रथा आहे. या प्रथेचा उगम नक्की कधी झाला हे तितकेसे सांगणे कठीण असले तरीही, पूर्वजांची कल्पकता यातून प्रतित होते.

नरकासुराच्या प्रतिकात्मक दहनासाठी कारिटाचा का वापर करण्यात आला? यामागचे विज्ञान आणि परंपरा आपण समजून घेऊया. दिवाळी म्हणजे नक्की काय, तर सुदृढ आरोग्याचा संदेश देणारा एक सण. पूर्वजांनी आपली संस्कृती टिकविताना याचा पुरेपूर विचार केलेला दिसतोय. कारिट डाव्या पायाने फोडल्याचा परिणाम वेगळाच आहे. आयुर्वेदामध्ये डाव्या पायाच्या ग्रंथीची नाळ थेट मेंदूपर्यंत असते, असा उल्लेख आहे. कारिटाचा गंध नाकापर्यंत पोहोचविणे, जिभेला लावणे यालाही आयुर्वेदात महत्त्व आहे. रक्ताभिसरणाची क्रिया या गंधामुळे तीव्र होते, असे तज्ज्ञांचे मत आहे. आणि ही प्रथा निर्माण करणाऱ्यांची कल्पकता तरी बघा, नरकासुराचे विचार कधी बदलणार नाहीत, नष्ट होणार नाहीत, कारण तो दृष्ट आहे. तसेच कारिट हे एक असे फळ जे वेलीपासून तोडले तरीही वर्षभर टिकते. आज तोडलेले कारिट पुढच्या दिवाळीला वापरू शकतो. तांदळाच्या कोंड्यात न फोडता हे कारिट ठेवायचे. जसेच्या तसे राहणार. लोखंड किंवा अन्य शस्त्र लागून जर आपल्या शरिराच्या कुठल्याही भागाला सूज आली तर कारिट फोडून लावल्यास सूज उतरते. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना बहुतेकदा पायाच्या बोटांना, नखांना कोर होते, तर त्यावेळी बोट कारटात बुडवून ठेवतात. यामुळे कोर बरी होते. जखमही भरून येते. सर्वाधिक कडू असलेल्या या फळाची त्यासाठीच तर निवड केली असावी. पण मित्रहो, एक परंपरा म्हणून याकडे पाहू नका, तर त्यामागील भावनेचा विचार करा. आपल्यातले दुर्गुण, दुर्विचार यासोबत नष्ट करा. पूर्वी कारिट ग्रामीण भागातच फोडली जायची, पण आज शहरी भागातही ती फोडली जातात. बस्स आज एवढंच, दिवाळीच्या गोड शुभेच्छा

••◆••

## दिवाळीचे गोडधोड, आपले आरोग्यभान, साखर व साखरमुक्तता

### २१ दिवस साखर बंद केल्याने शरीरात होणारे बदल — विज्ञान, अनुभव आणि परिणाम तुम्हाला माहित आहेत का?

साखर म्हणजे आपल्या आहारातील सर्वात गोड पण सर्वात धोकादायक सवय आहे. शरीराला ऊर्जा देणारे अन्न असूनही साखरेचा अतिरेक शरीरात विषासारखा परिणाम करतो. आजकाल अनेक लोक नो शुगर चॅलेंज म्हणजेच २१ दिवस साखर बंद करणे हा प्रयोग करत आहेत आणि त्यांच्या शरीरात चमत्कारिक बदल होत आहेत.

चला पाहूया, हे २१ दिवस साखर बंद केल्याने शरीरात नेमके कोणते बदल घडतात –

**१. पहिल्या तीन दिवसांत:**

शरीराचा संघर्ष आणि ताण जेव्हा तुम्ही अचानक साखर बंद करता, तेव्हा शरीराला विथड्रॉल सिंड्रोम येतो, कारण साखर मेंदूला डोपामाइन हा आनंद देणारा हार्मोन सोडायला प्रवृत्त करते. पहिल्या तीन दिवसांत डोकेदुखी, थकवा, चिडचिड, गोड खाण्याची तीव्र इच्छा जाणवते. काहींना झोप येत नाही किंवा ऊर्जा कमी वाटते. हे सर्व नैसर्गिक आहे, कारण शरीर साखरेवर अवलंबून झालेले असते. या काळात शरीर साखरेऐवजी चरबी आणि प्रथिनांकडून ऊर्जा घ्यायला शिकते.

**२. चार ते सात दिवस:**

मेंदू आणि पचनतंत्र स्थिर होऊ लागते साखर बंद ठेवल्यानंतर सुमारे एक आठवडा होताच शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण स्थिर व्हायला सुरुवात होते. ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहते, गॅस, फुगणे, पोटदुखी किंवा आम्लपित्त कमी होऊ लागते. झोपेची गुणवत्ता सुधारते आणि सकाळी उठल्यावर ताजेपणा जाणवतो. मेंदूतील धुंदी (ब्रेन फॉग) कमी होते आणि लक्ष केंद्रित करण्याची क्षमता वाढते. शरीर आता साखरेच्या जागी फळांतील नैसर्गिक ग्लुकोज आणि चरबीतील कॅलरीज वापरू लागते.

**३. आठ ते चौदा दिवस:**

त्वचा आणि यकृत सुधारू लागते दुसऱ्या आठवड्यात साखर न घेतल्याने यकृताचे काम हलके होते, कारण साखर म्हणजे मुख्यतः फ्रुक्टोज जी यकृतावर भार टाकते आणि चरबी बनवते. यकृतावरील भार कमी झाल्याने शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात. त्वचा स्वच्छ, उजळ आणि गुळगुळीत दिसू लागते. पिंपल्स, मुरुमे किंवा तेलकट त्वचेची समस्या कमी होते. शरीरातील पाणी साठवण्याची प्रवृत्ती कमी होते, त्यामुळे वजन थोडं कमी झाल्यासारखं वाटतं.

**४. पंधरा ते अठरा दिवस:**

शरीरातील चरबी कमी होऊ लागते या काळात शरीर साखरेऐवजी फॅटला ऊर्जा म्हणून वापरायला शिकते. फॅट जळू लागते आणि वजन कमी होण्याची प्रक्रिया सुरू होते. पोट, कंबर आणि मांडी भागातील साठलेली चरबी कमी होते. भूक नियंत्रित राहते आणि गोड पदार्थांची ओढ कमी होते. इन्सुलिन कमी झाल्याने मधुमेहाचा धोका कमी होतो. या टप्प्यात अनेकांना शरीरात हलकेपणा आणि ऊर्जा जाणवते.

**५. एकोणीस ते एकवीस दिवस:**

शरीराचा पुनर्जन्म २१ दिवस पूर्ण झाल्यावर शरीरात एक नवा समतोल बिंदू निर्माण होतो. रक्तदाब नियंत्रित राहतो, पचनसंस्था मजबूत होते, मन प्रसन्न, स्थिर आणि शांत वाटते. साखरेची सवय तुटते, कारण मेंदूला आता त्या कृत्रिम गोडीची गरज उरत नाही. त्वचा तेजस्वी, शरीर तंदुरुस्त आणि आत्मविश्वास वाढतो.

हे म्हणजे शरीराचा एक प्रकारचा रिसेट बटण दाबल्यासारखं असतं.

**६. वजन आणि मेटाबॉलिझममधील बदल**

साखर बंद केल्याने इन्सुलिन हार्मोन संतुलित होतो, जो साठवलेल्या चरबीवर नियंत्रण ठेवतो. त्यामुळे वजन आपोआप कमी होऊ लागते. पोटाची चरबी कमी होते, जी हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि मधुमेहाची मुख्य कारणे असतात. मेटाबॉलिझम म्हणजेच शरीराची जळण प्रक्रिया सुधारते आणि ऊर्जा पातळी वाढते.

**७. मानसिक आणि भावनिक आरोग्यावर परिणाम**

साखर म्हणजे केवळ अन्न नाही, तर एक प्रकारचा भावनिक ट्रिगर असतो. साखर बंद केल्यानंतर चिंता, नैराश्य आणि मूड स्विंग्स कमी होतात. मनाची स्थिरता आणि आत्मसंयम वाढतो. एकाग्रता, स्मरणशक्ती आणि निर्णयक्षमता वाढते. मेंदूला सतत नैसर्गिक ऊर्जा मिळत राहते, त्यामुळे थकवा कमी होतो.

**८. रोगप्रतिकारशक्ती वाढते**

साखर रक्तातील श्वेतपेशींना कमकुवत करते, त्यामुळे संसर्गाची शक्यता वाढते. २१ दिवस साखर बंद ठेवल्यावर रोगप्रतिकारशक्ती सुधारते. सर्दी, घसा दुखणे किंवा थकवा कमी होतो. शरीरातील सूज कमी होते, त्यामुळे सांधे आणि स्नायूंना आराम मिळतो.

**९. दीर्घकालीन परिणाम**

जर साखर २१ दिवसानंतरही बंद ठेवली किंवा फारच मर्यादित घेतली, तर मधुमेह, हृदयरोग, लठ्ठपणा आणि यकृताशी संबंधित आजारांची शक्यता कमी होते. शरीरातील पेशींचं वृद्धत्व मंदावते. त्वचा, केस आणि डोळ्यांची चमक दीर्घकाळ टिकते. झोप आणि लैंगिक आरोग्य सुधारतात.

**१०. साखरेऐवजी काय वापरावे**

साखर बंद करताना काही नैसर्गिक पर्याय वापरता येतात – मध्यम प्रमाणात गूळ, खजूर, मध किंवा फळांतील नैसर्गिक

गोडवा. कृत्रिम स्वीटनर टाळा, कारण ते मेंदूला पुन्हा गोडीची सवय लावतात. दिवसभर पुरेसं पाणी, फळे आणि प्रथिनेयुक्त आहार घ्या, जेणेकरून शरीरात ऊर्जा टिकून राहील.

२१ दिवस साखर बंद करणे हा फक्त आहारातील बदल नाही, तर जीवनशैलीतील पुनर्जन्म आहे.
या काळात शरीर विषारी घटकांपासून मुक्त होतं, मेंदू शांत होतो, त्वचा उजळते आणि मन नव्या ऊर्जेने भरून येतं.
प्रारंभी थोडा त्रास होतो, पण २१ दिवसांनी शरीर आणि मन दोन्ही नव्याने घडतात.
हेच २१ दिवस म्हणजे आरोग्य, आत्मसंयम आणि आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात.

••◈••

## वन सेवेतील अविस्मरणीय ४ प्रसंग ---

लेखक: वि. त्र्यं. पत्की, सेवानिवृत्त वन संरक्षक

### १.ऋषितुल्य श्री.पां. वा. नायक साहेब --

श्री. पां. वा. नायक,भा. प्र. से., हे वन विभागाचे सचिव या पदावर १९७८ ते १९८५ पर्यंत कार्यरत होते. मला त्यांचे अधिपत्याखाली अवर सचिव पदावर काम करण्याचे सौभाग्य ८-८-१९८३ ते ११-२ १९८५ पर्यंत मिळाले. ते मुंबई राज्यातील संस्कृत भाषेचे जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिप होल्डर होते. अतिशय साधी राहणी व अतिउच्च विचारसरणी आणि सरस्वतीची देणगी लाभलेले ते विद्वान, प्रामाणिक ,निस्पृह अधिकारी होते. त्यांच्या सौजन्यशील वर्तनाचे काही प्रसंग मी वाचकांचे माहितीसाठी सादर करित आहे.

१९८५ मध्ये ते महाबळेश्वरला एका दिवसाचे कामानिमित्त गेले होते. त्यावेळी श्री. वाळके, वि.व अ. सातारा आणि श्री नरवणे साहेब वन संरक्षक कोल्हापूर होते. त्यांना वन विभागाने दोन भोजन व एका नाष्ट्याचे बील रू. दहा दिले होते. दौ-यावरुन परत आल्यानंतर,त्यांनी मला बोलावून घेतले आणि विचारले की वन अधिकारी यांना दौऱ्यावर असताना बील अदा करण्यास काही सवलत असते कां ? मी, निरुत्तर झालो व गप्प बसलो. नंतर मी श्री वाळके यांना फोन लावून विचारणा केल्यावर त्यांनी पुष्टी केली व म्हणाले की साहेबांचा बंदोबस्त एकदम स्वस्तात झाला. पण नायक साहेबांनी श्री. नरवणे साहेबांना फोन लाऊन सूचना दिल्या की यापुढे प्रत्यक्ष खर्चाचे बील मला द्यावे, ती रक्कम मी देईन.

दुसरा प्रसंग त्यांच्या मेळघाट दौ-याचा आहे. श्री घाणेकर साहेब त्यावेळी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक होते. परत येतांना त्यांनी घाणेकर साहेबांना रू. दहा मागीतले व मुंबईस गेल्यावर रक्कम पाठवून देईन असे आश्वासन दिले. त्या आश्वासनांची त्यांनी सत्वर पूर्तता केली.

तिसरा प्रसंग आहे,१९८४ च्या गणेश चतुर्थीचा.सदरहू दिवशी शासकीय सुट्टी होती परंतु उच्च न्यायालयात मे. बल्लारपूर इंडस्ट्रीजने दाखल केलेल्या याचिकेवर दुसरे दिवसांपर्यंत शपथपत्र दाखल करणे बंधनकारक होते. म्हणून त्या दिवशी श्री .जाधव साहेब,मी, दोन स्टेनो व श्री केवलरामाणी सकाळी ९.०० ते रात्रौ १२.०० पर्यंत कार्यरत होतो. आमच्या सर्वांचे नाष्टा, भोजन, चहापान श्री. नायक साहेबांनी घरुन मागविले होते. केवढे महान औदार्य ? असा एकही वनाधिकारी माझे स्मरणात नाही. रात्रौ १२.०० नंतर त्यांनी मला शासकीय कारने डोंबिवलीस पोहोचते करण्याची व्यवस्था केली.

मसुद्यातील प्रत्येक शब्द ते तोलून, जोखून समाविष्ट करित होते. लघुटंकलेखकाचा वापर कसा करावा याचे ज्ञान त्यांनी मला दिले. असे महान अधिकारी आपल्याकडे होते म्हणून महाराष्ट्राची मान उंचावलेली आहे. नायक साहेबांना त्रिवार नमन.

••◈••

### २. तलवाडा हत्ती कॅंप मधील पाहुणचार –

लेखक: वि. त्र्यं. पत्की, सेवानिवृत्त वन संरक्षक



पिरमिल्ली वनक्षेत्रातील बांबूच्या लागवडीचे काम संपवून रेंगीने प्रत आलापल्लीचा प्रवास चालू झाला. रेशन पेटी खाली झाली होती, पाऊस कोसळत होता. नाल्यांना पूर आला होता. मोठ्या मुष्कीलीने तलवाडा येथे पोहोचलो. हा मोठा नाला ओलांडणे अशक्य होते. त्यावेळी हत्ती कॅंप तलवाडा येथे होता, आता पायातील येथे आहे.रात्रीचे भोजनास दांडी मारली.सकाळी थोडे पोहे खाल्ले.रेशनपेटी संपूर्ण खाली झाल्याची माहिती नामदेवाने दिली.त्या दिवशी रात्रीचे भोजनास दांडी मारणे क्रमप्राप्त होते.पोटात कावळे ओरडत होते. काही वेळाने एक महाशय माझेकडे आला आणि म्हणाला, "साब भोजके लिये आईये". मी आढेवेढे न घेता गेलो. एका पानावर थोडासा जाडाभरडा लाल रंगाचा भात व शेजारी मोठ्या खड्याचे मीठ व काळसर गूळाचा खडा होता. ओशाळून महावत म्हणाला, "साब सब लोक यही खा रहे है,आपभी भूके मत रहना." देवाचे नामस्मरण करिता मी हत्तीचे भोजन घेऊन भूक शमविली.

माझे कर्मचारी,आदिवासी बांधव कसे जीवन जगतात यांचा धडा ईश्वराने मला दिला होता. तेंव्हापासून मी कधीही भोजनावर वाईट भाष्य केले नाही आणि पानात पडेल त्यास प्रसाद समजून ग्रहण केले.

दुसरे दिवशी सकाळी पूर ओसरल्यानंतर हत्तीवर स्वार होऊन आलापल्लीस आलो. तलवाड्याचा पाहुणचार मी कधीही विसरणार नाही.फॉरेस्ट फाईव्ह स्टार !!!

••◈••



### ३.गोटुलातील वास्तव्य--

जून, १९६८चा कालावधी होता. आलापल्ली वन विभागातील पिरमिल्ली वनक्षेत्रात ५० हे. वनक्षेत्रात केंद्र पुरस्कृत बांबू योजनेचे वनीकरण करण्याचे उदिष्ट होते. श्री. रा. ल. चौधरी, वि.व.अ. यांनी या कामावर देखरेख करण्याचे काम माझे वर सोपविले होते. श्री. सी. टी. ठाकरे हे वनक्षेत्रपाल पिरमिल्ली होते. त्यांनी सांगीतले की पिरमिल्ली पासून रोपवन क्षेत्र ९-१० कि.मी. आहे आणि गुरपल्ली गावापासून ४ कि.मी. अंतरावर आहे.शिवाय गुरपल्लीला मुक्कामासाठी "गोटुल" पण आहे. मी, गुरपल्लीस मुक्कामासाठी प्राधान्य दिले.

वनक्षेत्रपाल यांनी बांबूची पिशव्यातील रोपे लागवड स्थळाजवळ मोठा पावसाळा सुरु होण्याचे आधी वाहतुक केली होती. प्रति हेक्टरी २७८ रोपांची लागवड करणेची होती. त्यामुळे वनीकरणाचे मोठे काम आधीच मार्गी लागले होते.

"गोटुल" प्रवेश- आलापल्लीहून बैल रेंगीतून गुरपल्ली प्रवासास पूर्ण दिवस गेला. थकून गेलो होतो, परंतु गोटुल जाणून

घेण्याची प्रखर इच्छा होती. मी आणि माझा शिपाई श्री. नामदेव बावणे गोकुळात पोहोचलो तेंव्हा गोटुळात गोकुळ चालू होते. आत जावे की नाही या संभ्रमात असतांनाच,नामदेवाने बेधडक सामान आत घुसविले व आम्ही दोघे येथे मुक्काम करणार आहोत हे जाहीर केले. गावचा मुखिया तिथे होता. त्याला थोडे मराठी येत होते. त्याने आमचे स्वागत केले व सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. मला आश्चर्याचा सुखद धक्का बसला. गोटुल म्हणजे समाजाचे मनोरंजन किंवा करमणूक केंद्र. महिला-पुरूष,मुले-बाळे, म्हातारे-कोतारे सर्वजण गप्पा-गोष्टी, नृत्य, संगीत यांचा मनमुराद आनंद घेत होते. काही जणांनी मंदिरा प्राशन केली होती. महिलांचे अंग गोंदून आकर्षक केले होते . बिभीत्सपणा बिलकुल नव्हता.

मी, एका कोपरयात बसून हे न्याहाळत होतो.निस्सिम आनंद प्रत्येक व्यक्ती घेत होता. संपूर्ण जमीन शेणाने सारवलेली होती. स्वच्छता लाजविल अशी होती. हे सर्व चालू असताना नामदेवाने एका कोपर्यात स्वयंपाक सुरू केला होता व त्यास कुणीही आक्षेप घेतला नव्हता.सुमारे दोन तासांनी गावकरी घरी परतले. मुखियाने एक नवारीची खाट माझे साठी पाठविली. एका महिलेने पाणी आणून दिले.

अतिथी देवो भवचा मतितार्थ समजला.

••◈••

## ४.साखरेचं खाणार त्याला देव देणारं –

लेखक: वि. त्र्यं. पत्की, सेवानिवृत्त वन संरक्षक

सुमारे ६० वर्षापूर्वी जनतेस गहू, तांदुळ, ज्वारी, केरोसीन, साखर इत्यादी अनेक वस्तु मर्यादीत स्वरूपात आणि रेशनवर मिळायच्या. लाल ज्वारी किती जणांनी खाल्ली आहे ?असो ! हा प्रसंग आहे १९६७ घ्या दिवाळी सणाचे पूर्वीचा. साखरेचा तुटवडा व रेशन,दिवाळीत गोड पदार्थ तयार करणे म्हणजे गृहिणींची कठोर परीक्षा होती. पण विभागीय वन अधिका-याचे पत्नीस ही परीक्षा उत्तीर्ण करण्याची प्रबळ इच्छा होती.होय,सौ.सरवटे बाईसाहेब त्या होत्या.

मी, लग्गाम वन क्षेत्राचे कार्यभारात होतो. श्री. जे. बी. भुते, वनक्षेत्रपाल होते. एके दिवशी आम्ही दोघे वि.व.अ. यांनी आयोजीत केलेल्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी विभागीय कार्यालयाचे प्रांगणात पोहोचलो होतो, तेवढ्यात तिथे एक व्यक्ती आली आणि म्हणाली" बाईसाहेबांनी श्री. भुते यांना बोलविले आहे."म्हणून श्री. भुते त्यांचे बरोबर बंगल्यावर गेले. १५-२० मिनीटात ते परत आले. नंतर आमची बैठक झाली व सायंकाळी आम्ही चौडमपल्लीस परतण्यासाठी बस स्थानकावर आलो.तेंव्हा मी श्री. भुतेंना विचारले की, बाईसाहेब यांनी कशासाठी तुम्हाला बोलविले होते ? तेंव्हा,ते हसूनं म्हणाले की त्यांना दोन शेर साखर विकत पाहिजे होती, दिवाळीचा फराळ करण्यासाठी. पण ही बाब त्यांचे पतीस म्हणजे सरवटे साहेबांना समजता कामा नये ही त्यांची तंबी होती. त्यावेळी साखर १२ आणे शेर होती. २-३ दिवसांनी श्री. भुते यांनी २५ शेर साखरेची गोणी गुपचूप बाई साहेबांकडे पोहोचती केली. त्या तेवढी मोठी गोणी घेण्यास तयार नव्हत्या आणि मूल्य देण्यास हट्ट करित होत्या. शेवटी कशीतरी देवाण-घेवाण झाली. परंतु साहेबांना समजू नये म्हणून ही गोणी शिपायाचे घरी ठेवण्याचे ठरवले. अशा रितीने साखरेचं खाणार त्याला देव देणारं यांची प्रचिती आली. पूर्वीच्या वन अधिकार्यांची नीतीमत्ता, शिस्त, दरारा किती जबरदस्त होता याची जाणीव आजकालच्या तरुण वनकर्मचारी आणि वनाधिकारी यांना व्हावी म्हणून हा प्रसंग हेतूपुरस्सर मी मांडला आहे. अशा वन अधिका-यांमुळे महाराष्ट्राचे नांव आदराने भारतवर्षात घेतले जाते.

••◈••

## भामरागड वन विभागातील अनुभूती

लेखक: एम. ए. सैदाणे.से. नि. वि.व.अधिकारी

मी भामरागड वन विभागात प्रथमच येथे सेवेत रुजू झालो. रुजू अहवाल देउन मुक्काम केला.त्यावेळेस रस्त्यावर खडी, माती व दगड असल्याने , प्रवासात शरीर फार खिळखिळे होउन जात होते. तेथे खूप वन अधिकारी असल्याने निवासस्थान मिळवणेसाठी प्रयत्न करावे लागले . शेवटी वनविकास महामंडळाचे येथील निवासस्थान मिळाले.

त्यावेळेस विभागीय वन अधिकारी म्हणून श्री वि.के.सिन्हा होते. वाहने कमी असल्याने वाटून घ्यावी लागत होती. पुढील दौरा सहकारी अधिकारी नसल्याने व भामरागड कडे प्रशिक्षणाची तुकडी आलेने झाला. रस्त्यावर ग्लोरी ऑफ आलापलली प्रशिक्षणार्थी नी पाहिले. हे क्षेत्र नैसर्गीक राखीव प्लाट आहे. उद्देश हाच की नैसर्गीक स्थितीत जंगल राखले जावे. सदर क्षेत्र सहा हे. असून कंपार्टमेंट नंबर 76आहे. त्याची स्थापना 1953 वर्षांत झाली आहे. यात सर्वात उंच वृक्ष 39.70 मी. होता. व द्रुसरा वृक्ष ची गोलाई 5.37मी.होती. ही साईट प्रथम 1867 साली ब्रिटीश अधिकारीने पाहिली. ही साईट आता जैवविविधता वारसा साईट म्हणून घोषित झाली आहे. पुढे पेपर मिल बल्लारपूर यानी काम केलेले क्षेत्राची पहाणी सर्वासमक्ष केली. बांबू कापणी व काढणी नियमानुसार झाल्याचे पाहिले.

त्यानंतर लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा, येथे समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे संचलित हॉस्पीटल, शाळां, माध्यमिक शाळा व वन्यजीव अनाथालय पाहिले. या अनाथालयात आदिवासीं हे, अपघात झालेले, जखमी, वन्यजीव (प्राणी,पक्षि) उपचारासाठी आणून देतात. या भागातील गौड, माडीया आदिवासीं तसेच लगतचे भागातील मराठी, नदी पलीकडून तेलगू भाषिक, छत्तीसगड चे आदिवासीं या हॉस्पीटल मध्ये येवून मोफत उपचार व औषधे घेतात. फारच उच्च प्रतीची सेवा डॉ. मंदाताई व डॉ. प्रकाश आमटे तर्फे येथे पुरवली जाते. सदर संस्थांमधील समाजसेवेसाठी त्याना आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. एका परदेशी राष्ट्राने पोस्टल तिकीट देखील काढले आहे.या संस्थांमधील समाजसेवे बाबत एक अल्प चित्रपट "डॉ. प्रकाश बाबा आमटे " काढलाय. सदर चित्रपट पहाण्या सारखा आहे. आदिवासींचे जीवन जगणे व हे मरणे सत्य दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. पुढे प्रशिक्षणाची तुकडीला परत पाठवून आम्ही पुढे अबूज माड पहाडावर गेलो. तेथे 'बडा माडीया ' आदिवासींची वसाहत आहे. ते फक्त लंगोटी वर रहातात, आणि गोरका (ताडी) चे रस पिऊन रहातात. त्यांच्याबरोबर शासनाने चर्चेनंतर सांगितले ,की पहाडी वरुन खाली चला, तुम्हाला तिथे शेती, पक्की घरे देउ. ते नाही म्हणतात. आम्हाला सरकार खाली नेणार व आमचा गोरका (ताडी) बाहेर नेउन विकणार. त्यानंतर आम्ही वर पहाडी भागातील जंगलात गेलो, तेथे फक्त एकाच घराची 'धिरंगी गाव' नावाची ग्रामपंचायत होती, त्यावेळेस मी पहिल्यांदाच भेट देणारा शासकीय अधिकारी ठरलो.सोबत पेपर मिल चे अधिकारी, कामगार होते. पुढे दाट जंगलात 'विष्णु' नावाचा उच धबधबा होता, त्यात भिजून गावात थांबलो. दुसर्या दिवशी गोटूल मध्ये [समाज मंदिरात] आदिवासींचे नृत्य पहाणेस गेल्यावर तेथे तरुण/तरुणी नृत्य करत होते. त्यास रेला संबोधतात. ही एक प्रकारे त्याच्या देवीचे प्रार्थना आहे.अंगात दुखत असेल तर ते जाते असा समज आहे. त्याच्याकडे अशी प्रथा आहे की, मुली वराचे नाव सुचवतात असे असते. नंतर नवरा मुलानेच मुलीच्या बापाला पैसे, गाय, म्हैस व इतर, अंदण द्यावयाचे असते. मुलगा गरीब असल्यास त्याने घर जावई म्हणून मुलीकडे काम करावयाचे असते.

ज्या वेळेस साखर पुडा असतो, तेव्हा खालील गाणे ते नाचत म्हणतात.

रेला .... रेला ....रेला ....
बेटल कितीबल राजाले...टायेर राजा वनी,
निमीष उत्ती जलालीजुला आई सेके ,
नाग बारी किसी बाबा,
नाना साईबी सिली बाबा,
नाना साईबी सिली बेदी,
नाना अव्वल सिता,
बाबांना कोरटल पेडली तिनडावाता,
जोडाजोडा आवाना कोराटे,

नवरी मुलगी तिच्या भावना व्यक्त करते. जेव्हा ती तिच्या आई वडिलांपासून विभक्त होते. आणि जेव्हा तिच्या आई वडिलांना परत येवून भेटेल, तेव्हा ती त्याचे सोबत प्रेमाचे जेवण घेईल.

माडीया/गौड आदिवासीं च्या लग्नात मध्य पिल्लर (मुंडा) चे भोवती ताल धरुन शुभारंभानिमित्त गाणे म्हटल जाते . हा मध्य पिल्लर सालई वृक्षाचा असतो. त्याचे मानणे आहे की, देवी माता परसापेन ही सालई वृक्ष रुपात अदृश्य आहे.लग्न मंडपात वधू पक्षावरुन सालई मुडा वरील भावना चितारली आहेत. त्याचा सारांश गाण्यात आहे.

रेला .... रेला ....रेला ....
साली मुंडा रायता,
निवा मालु रोयता
निवा रेलुआ मालुये,
रेला .... रेला ....रेला
निवा पोचची दयानंद,
पाटा होतेके नातासके
निवा रेलुआ मालुये,
रेला .... रेला ....रेला ..
पाटा होतेके नातासके
धरमे पोटा ओसटा
साली मुनउ रोयता
निवा रेलुआ मालुये,
रेला .... रेला ....रेला .
निवा जिवा ओइतंआ
निवा रेलुआ मालुये,
रेला .... रेला ....रेला

या गाण्याचा मतीत अर्थ असा होतो की, वधू पक्ष म्हणतात 'सालई चा पिल्लर वाकला आहे. लग्नानंतर कोणीच येणार नाहीत . वधुचे हृदय दुर जाण्याने पिळवटून निघाले आहे. वधूची लहान बहीण व सर्व नातेवाईक दबले आहेत.

सदर आदिवासीबहुल क्षेत्र अत्यंत दुर्गम, पहाडी,घनदाट वृक्षां!नी नटलेला असा भाग आहे.त्या ठिकाणी मोठ्या लोह फॅक्टरी देऊन त्याची संस्कृती लोप पावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हा नैसर्गीक ठेवा कायमचा दुर्लभ होईल.

पुढे गट्टा भागातील क्षेत्रात पावसाळ्यानंतर गेलो असता तेथे पुर्ण पावसाळा रस्त्यावर अडथडा असायचा नदी, नाले तुडूंब भरुन असायचे. तेथे पोहोचल्यावर तेथील कर्मचारी म्हणायचे की, काही खायला आणलेत काय साहेब?. अश्या दुर्गम भागात कर्मचारी रहातात.

पुढे उन्हाळ्यातील तेंदू पत्ता (बिडी) हंगाम सुरू व्हायचा.तेव्हा फारच वर्दळ असायची. नक्षलवाद ग्रस्त भागात दौरा करणे फारच जिकीरीचे व कठीण रहायचे. त्या वेळी कसनसूर भागात कोटमी उप क्षेत्रात गेलो असता अतिशय दुर्गम, खोल जंगलात हद्दीबाहेरील मजूर आत येऊन तेंदूपाने तोडत होते , त्याना पकडून आम्ही पोलीस स्टेशन एटापल्ली येथे आरोपी दिले होते. दुसऱ्या दिवशी मौकयावर चौकशीनंतर आम्हा चार पाच अधिकारी विस- पंचवीस कर्मचारी याचे अपहरण केले होते. व आम्हांला घेराव केला होता. आमच्यावर साठ ते सत्तर बाया माणसाकडून हल्ला केला होता. शिवीगाळ मारहाण केली होती. आमचा मृत्यु अटल होता. मृत्यु नंतर काय होईल, पुनर्जन्म कोठे मिळेल असे विचार यावयास लागले होते.त्यानंतर खूप उशीरा ते म्हणाले की , तुम्ही नेलेले आरोपी सोडा, तरच तुम्हाला जिवंत सोडू. त्यानी सांगीतले नंतर मी मुख्यालयात चिठ्ठी पाठवली. ती चिठ्ठी मुख्यालयात दफेदाराकडून पोहोचल्यानंतर पोलीसांकडून पंधरा ते वीस गाड्यांतून हत्यारे, शस्त्रास्त्र घेऊन शोध मोहीम निघाल्यावर, त्यापूर्वी आम्हाला नक्षलवादीकडून सोडण्यात आले. व आमचे कर्मचारी तेथेच थांबवून घेतले. व पूर्ण दिवसआम्ही तेथे होतो व वाचलो.

कालांतराने त्यावेळेस लोकसभा व विधानसभा निवडणूका आल्या. त्यावेळेस झोनल अधिकारी म्हणून मला नेमण्यात आले होते. त्या निवडणुकीचे दिवशीच मौजे घोटसूर (ता. एटापल्ली) ला बुथ वर भेट देवून आम्ही गेल्यावर पाचच मिनिटात नक्षलवादी व दोन इसम तलवार धारक व इतर लोक शस्त्रास्त्र घेऊन बॅनर पेपर , बॅलट फाडले व आग लावली. निवडणूक कार्यक्रम उध्वस्त केला. तेथे काही मिनिटं मुळे आम्ही वाचलो. निवडणूकवर नंतर समजले की तिकडून (नक्षलवादीकडून) बहिष्कार होता. त्यानंतर तेथे फेर निवडणूक घेण्यात आली.

कालांतराने मला कार्य आयोजना कडे अल्प कालावधीसाठी सेवा देण्यासाठी पाठविले. सिरोचा वन विभागातील घन चित्रण चे काम करण्यासाठी पाठविण्यात आले होते. ते काम सहा रेंजर्सचे मदतीने करावयाचे होते. तात्काल आम्ही सर्व कर्मचाऱ्यांवर ठराविक कालावधीपर्यंत हे दिलेले काम पूर्ण करावयाचे होते. प्रथम कमलापूर रेंजपासून सुरवात केली व तेथील निरीक्षण कुटीत एक महिना मुक्कामात राहून काम केले. रोज सकाळी उठून प्रत्येकाने वन मजूर समवेत एक वेगळ्यावेगळ्या कक्षात जावून निरीक्षण, कक्ष इतिहास फार्म मध्ये निरीक्षण नोंदवून घेण्यात येत होते. उदाहरणार्थ हाइट ग्रोथ, स्पेशल प्रजाती उदा.खैर, बांबू , चंदन इत्यादीं., खुरटे, अत्यंत कमी स्टाक, कुरण, जुने रोपवने, रिक्त क्षेत्र, धूप झालेले क्षेत्र, अतिक्रमण, बांबू घनता ( चागली, मध्यम, अल्प), वनीकरण (वर्ष, प्रजाती), वन ग्राम, घनता(0.5, 0.4, 0.6 इत्यादीं) सॅम्पल प्लॅट, रोपवन योग्य क्षेत्र(साग, मिक्स, वनीकरण), वर्कींगसर्कल नावे , मातीचे वर्गीकरण इत्यादींवर माहिती नोंदवली जायची.

काम सुरू असतानाच श्री देशमुख विभागीय वन अधिकारी नेहमीच मार्गदर्शनासाठी यायचे. एकदा श्री सुदर्शनलाल डबराल वनसंरक्षक (कार्य आयोजना) कडून दिवसभर प्रत्येक कर्मचारीची कमाची पडताळणी झाली. या साहेबचे नाव सर्वाना माहिती आहे. त्यांनी भारी पहाडावर (मध्य चं !दा) विभागातील झालेले अतिक्रमणांवरील झोपड्या आग लावून, मोडून, तोडून टाकल्या. आणि भारी पहाड अतिक्रमण विरहित केले होते. परंतु शासन स्थगिती आदेश आलेने भारी पहाडावर (मध्य चं !दा) विभागातील झालेले अतिक्रमण 'जैसे थे' झाले. मराठवाडय़ातील व इतर भागातुन अतिक्रमीत आले आणि स्थानिक कोलाम आदिवासींच्या जमीनीवर व जंगलात अतिक्रमण केले.

वनसंरक्षक साहेब यानी मोलाचे मार्गदर्शन केले. कथीत कामे आम्ही कमलापूर, जिमलगटटा, देचली, असरअली, सिरोंचा आणि रेपनपलली, परिक्षेत्रात मुख्यालयात राहून केली. जमल्यास दुर्गम भाग, आवलमारी, देवलमारी, कोलामारका पहाडी व नदी, नाले, बोटीतून जावून कामे इत्यादींवर केले आहे. गोदावरी तीरावरील सर्वात मोठे मंदिर महाकाळेशवर, शिवलिंगाची दर्शन घेतले व पुजा आर्चा केली. त्यानंतर दक्षिणेकडील गंगा गोदावरी नदीत बोटीत फिरुन स्नान केले. मंदिरासमोर नदीचे पात्र चार ते पाच मैल रुंदीचे होते.

परत येताना मुरेवाही या परीसरात घन चित्रण करत असता एक घटना समजली. तेथील माजी पटेल यास ब्रिटिश मार्फत गौरविण्यात आले होते.त्या इसमाने तत्कालीन ब्रिटिश वन संरक्षकाची वाघाचे हल्ल्यातून जीव वाचवून सुटका केली होती. म्हणून त्यास विकटोरिया क्रांस ,चांदीचे कडे, जमीन, पट्टा, बॅज व प्रमाणपत्र व कायम पेन्शन दिले आहेत. याच वेळेस ग्लास फोर्ट पेठा या गावातील लोकं ड्रम एवढे ढोल वाजवून स्वागत केले.

थोडक्यात भामरागड वन विभागात अत्यंत दुर्गम असून दुर्मीळ प्राणीजीवन, पक्षि उदाहरणार्थ उडती खार, हारन बिल (धनेश), गिधाडे इत्यादीं व बडा माडीया सारखे प्राथमिक आदिवासीबहुल भाग निसर्गाच्या सान्निध्यात आहे. अजून ही ह्या काही भागात मानव गेला नसल्याचे नाकारता येत नाही. तरी हा दुर्मीळ, निसर्ग ठेवा कायम संरक्षित असावा, याबाबत निसर्ग प्रेमी इच्छुक आहेत.

----------×---------

## विशेष स्मृती लेख



## The Fifth Field Director

-Ajay M Pillarisett, DFO (Retd)

The Melghat Tiger Reserve after its inception in 1973 had the privilege of having Mr. M.G. Gogate as the 5th Field Director in

1986-87. Many of the Field Directors till then had the dubious distinction of not seeing a Tiger in the wild in Melghat Tiger Reserve. This probably posed a challenge to Mr. Gogate Saheb and as soon as he joined, he wanted to change the reputation of Melghat Tiger Reserve and also of the Field Director.

His field tours were focused on covering maximum area and he interacted with the field staff and even the villagers to understand the situation. The then Kolkaz Range was the biggest Range covering over 600 sq.kms. of East Melghat Forest Division. As Range Officer Project Tiger Kolkaz major work was making panchanama of cattle kills made by Tiger and submitting the cases for payment of compensation. Gogate Saheb understood that the payment of compensation was delayed due to the paperwork. He initiated immediat payment of part compensation to the cattle owner and the application
was to be attached with the photograph of the cattle owner with the cattle killed by Tiger or Panthe. Many a poor Korku and Gawali must have been relieved by this action.

In the subsequent visits, he pressed the issue of Tiger sighting, I told him, Sir Tiger is the King of the Jungle and to get his audience is difficult but we can try and see him when he is dining and it will entail some risk and some physical effort with bearing physical discomfort for sometime till the Tiger finishes his meal, he agreed. His willingness to try my new ideas and willingness to take risks, it was decided that on report of fresh cattle kill a machan be made and the Field Director be informed. That time Melghat Tigers were largely dependent on cattle for food. Yearly nearly 300 cattle kills used to be reported. One afternoon on receiving news of cattle kill by Tiger near Bhumka Baba nulla on Semadoh Kolkaz road, we made the machan and informed Gogate Saheb. He reached Semadoh late in the evening. Armed with a Fourcell Eveready torch, we got down on the road and with 4 companions walked along the nulla and ascended the hillock and reached the place of buffalo kill. I had secured the buffalo with a rope to an old stump so that Tiger would not drag the kill away or we would miss his darshan from the machan. Both of us climbed on tree with a rope ladder and sat on the machan which was about 20 mt. above ground level. Our companions were told to talk among themselves and go back to the vehicle. The sun had set and it was becoming dark.

After about half an hour there was rustling in the undergrowth below and a big sound of wood breaking and something heavy being moved was heard. We were sure that the Tiger had come and pulled the kill which broke the stump. I held the torch high and still and put it on. There was the tiger, it looked up at the torch light which was still. It then started feeding. We had seen the tiger and did not want to disturb him, so we put off the torchlight. It fed on the kill sound of breaking bones and occasional shifting were heard. We listened to the sounds and did not want to disturb his feeding. After some time all sounds subsided and there was silence. We waited and then threw a stick in the direction of the kill. There was no reaction or any sound. The Tiger had eaten and left to probably to drink water. We get down and started descending, our companions meet us halfway down and we reached the road and the vehicle. Gogate saheb was excited and said "Chala Mi shevati bhopla fodla." Then started the real innings. Few days later Mr. V. K. Mohan who was Dy. Conservato, West Melghat accompanied Gogate saheb and again we sat on a kill behind PWD rest house at Semadoh and again saw tiger. This time there were 2 tigers and lot of growling during feeding.

Above incidents and his inherent nature to learn and do something positive gave birth to the idea of Satellite core area. The original core area comprised of unworkable area having hilly terrain with steep slopes so he understood that rich area of Raipur, Kuapati Valley and Chunkhadi should be kept with minimum disturbance so that the wildlife in the area will thrive. Also, the tourism zone covering Pipalpadav, Kuapati Padav, Cheddnpati, Baramanda and Chamarudhada was identified and grazing was prohibited in the area. Then the wildlife started thriving in that area too. These were very significant decisions and its results are seen even today. Such was his involvement with the area.

After seeing the Tigers he said we should have a photograph of Melghat Tiger. The best Tiger we saw was at Kakoti padav water hole. One day while we were comming from Jarida near Chunkhadi we met Forest guard K.B. Semalkar. Gogate asked him can we see a tiger in the day time, the Forest guard said that there is a remote waterhole called Kakoti padav, we stand a good chance of seeing the tiger there. He was instructed to make a machan and in a few days we decided to visit the place. That day Gogate saheb came at about 2.00 pm to Semadoh. He checked his camera, lenses and other equipment and then we started for Chunkhadi. The Forest guard was present and we proceeded to Kakoti padav. We climbed and sat on the machan. Gogate saheb had taken his camera and left the bag at the base of the tree. We sat on the machan and the Forest guard sat on the V branch below the machan. At 4.15 P.M. the guard said the tiger is coming. The tiger was coming from the opposite side on the other bank of the nalla. Since it is a remote area, it was approaching without any caution. It came to the waterhole, drank little water and then turned around and slowly descended in the waterhole in reverse fashion, that most tigers do and sat in the waterhole. Gogate saheb was busy with his camera, then suddenly said that the camera was not loaded. The film roll had to be loaded, but the film roll was in his bag and the bag was at the bottom of the tree. The Forest guard was acrobatically trying to reach the bag that created a sound and the tiger got up and looked at the machan, seeing us it bolted and climbed the bank and turned round and had a good look at us and the machan. We had seen the tiger in the daytime for some time but could not catch him in the camera. We saw the tiger with our bare eyes hence its image is deeply etched in memory even today.

Then Kakoti padav become famous, many people visited Kakoti padav but some how could not see the tiger. The Tiger would see the machan and if there were people it would not come to the water hole, this continued for quite some time. This was the typical Melghat Tiger. Gogate Saheb always said that "Waghache Waghpan Ghalvu Naka". But in many of the areas the Tigers have lost their Waghpan. Fortunately, in some areas that the Tiger has retained his Waghpan.

In his tenure field staff were encouraged to write and narrate experiences and study animal behavior and habitat which was instrumental in publishing Two Decades of Project Tiger Melghat document. We were encouraged to give lectures and make presentations and it was this, that made me apply for Kailash Sankhla Wildlife fellowship and on his recommendation I was awarded the fellowship in 1998, when he was P.C.C.F. Wildlife.

His contributions are innumerable and wherever he went, his contributions created useful assets. Nature Interpretation Center at Semadoh was evolved through his guidance. He was an ardent follower of inhouse knowledge,

talent and believed in using inhouse resources. His younger brother who was in National Museum New Delhi, he and his two companions camped in Kolkaz and gave very useful inputs for the development of the Interpretation Centre. The staff and even the local people, artisans all have contributed in developing the Interpretation center also.

We were brought up on insourcing not outsourcing. But today, it is the age of outsourcing which entails much costs and we lose the sense of belonging with the creation. This is the sole malady that is affecting all the constituents in life today. That's why the present generation is not able to relate with our environment, our wild life, our people and even the family members. The principles of Gogate Saheb if followed can help create a better world. JAI HIND, JAI NISARG.

## आरोग्य साधना

### या दिवाळीसाठी तळण तळण्याच्या योग्य वेळा

16 ऑक्टोबर: दुपारी 1.30 ते 4.30
17 Oct : दुपारी 2.15 pm to 5.15 pm
18 Oct : दुपारी 3 pm to 6 pm
19 Oct : दुपारी 3.45 pm to 6.45 pm
20 Oct : सायंकाळी 4.30 pm to 7.30 pm
21 Oct : सायंकाळी 5.15pm to 8.15 pm
22 Oct : सायंकाळी 6 pm to 9 pm
23 Oct : सायंकाळी 6.45 pm to 9.45 pm
24 Oct : सायंकाळी 7.30 pm to 10.30 pm
25 Oct : रात्री 8.15 pm to 11.15 pm

अधिक माहितीसाठी खालील लेख व विश्लेषण वाचा..
........

### भरती आणि ओहोटीचा स्वयंपाकावर परिणाम होतो का ?

उत्तर: हो

१) एखाद्या वर्षी दिवाळीत मोठ्या प्रमाणात चकल्या, अनारसे , शंकरपाळे केल्यावर ते पदार्थ आपण ज्या डब्यात ठेवतो, त्याच्या तळाशी खूप सारे तेल जमते, आणि ते पदार्थ ही मऊ होतात. पदार्थ करणारी व्यक्ती आणि जिन्नसाचे प्रमाण ही तेच असते परंतु त्या पदार्थांत खूप तेल शोषले जाते. बटाटेवडे / भजी केली तर कधी कधी ते खूप तेल पितात. ह्याचे कारण म्हणजे तो पदार्थ नेमका ओहोटीच्या वेळेत तळला गेलेला असतो.

२) जर पदार्थ भरतीच्या वेळेत तळला गेला तर खूप कमी तेल लागते व पदार्थ ही छान होतो आणि आरोग्याच्या दृष्टीने ते चांगले असते.

३) भरती ओहोटीची वेळ कशी काढावी ? ती खालील प्रमाणे---- वृत्तपत्रात किंवा नेटवर ती मिळतेच पण एक साधी आणि सोपी पद्धत खाली देत आहेत.

कालनिर्णयवर आजची तिथी बघावी ,उदारणार्थ आजची कृ. २ आहे , तिथी कृ. २ × ३/४ = १.५ , आता १.५ म्हणजे दुपारी १.३० वाजता पूर्ण भरती आहे. पूर्ण भरतीच्या साधारण 3 तास आधी तळण सुरू करावे. (सकाळी १०.३० वाजल्यापासून ते दुपारी १.३० वाजेपर्यंत) पण जर तुम्ही दुपारी १.३० नंतर तळणाला सुरवात केलीत तर जसजशी वेळ पुढे जाईल तसतसे पदार्थ जास्त तेल शोषेल.

४) जेव्हा आपण मोठ्या प्रमाणात तळण करणार असू तेंव्हा ही वेळ पाळली तर पदार्थात तेल खूप कमी शोषले जाईल, पदार्थही चांगला होईल आणि ते आरोग्यासही उत्तम राहील. आमच्या घरी दिवाळीचे सर्व पदार्थ वरील पद्धतीने भरती आणि ओहोटीची वेळ बघून केले जातात. हा प्रयोग तुम्हीही अवश्य करून बघा ; विशेष करून केटरिंगचा व्यवसाय करणार्यांनी.

----अवधूत वेलणकर
कॉपी पेस्ट

## जुन्या आठवणी

# खंत कायमची राहून गेली

लेखक : जयप्रकाश आनंदराव पाटील, धुळे

२००८-०९ ची घटना आहे ही. मी आर .एफ . ओ नंदुरबार म्हणून कार्यरत होतो.विधानसभेची निवडणूक होती. मला निवडणुकीत झोनल ऑफिसर म्हणून शहादा तालुक्यात नेमणुक होती. नंदूरबार येथून सकाळी ९ खेड्यांचे १६ बूथवर २ एसटीचे साहाय्याने १२४ जणांना घेऊन जानेचे काम होते. झोनल ऑफिसर चे टेबलवर बसलो होतो. डेपो वनरक्षक पी. एस.पाटील नावाचे वन रक्षक आले, आले आणि सांगू लागले,"साहेब कोपर्ली गावात वाघ निघाला आहे त्याला पकडून नेण्यासाठी तालुका पोलिस स्टेशन मधून वायरलेस मेसेज आला आहे कोपर्ली पोलिस आऊट पोस्ट मधून फोन आला आहे". रेंज ऑफिस तहसील कार्यालय जवळ होते. मी कार्यालयात जाऊन खात्री केली. मेसेज खरे होते. त्यावेळी नंदुरबार वनविभागात श्री एन. आर. प्रवीण हे उपवनसंरक्षक होते . मी त्यांना फोन लावला बिबट असावा. मी इलेक्शनमध्ये ड्यूटिस आहे मला कोपर्ली जाणे शक्य नाही. साहेबांनी नंदुरबार सहाय्यक वन संरक्षक याना घेऊन पिंजरा घेऊन तीन, चार स्टाफसह शहादा हून १ तासात कोपर्ली येथे आले. पाहतात तर पोलिस आऊट पोस्टचे बाहेर बिबट नर मारून पडलेला. श्रीमान पाडवी साहेबांनी त्याचे पायाचे ठसे कागदावर उमटवली आणि आगार रक्षक पाटील याना वन गुन्हा नोंद करायला लाऊन बिबट यास तिथे गावाजवळ त्याच वेळा जाळून टाकले. मी तीन दिवस पूर्ण निवडणूक कामी अडकलो होतो. पत्रकार, पेपर, चॅनलवाले यानी गदारोळ केला. चांगल्या पेपर मध्ये फ्रंट पेज वर हेडिंगने बातम्या आल्यात.

पत्रकार मला ऑफिस मध्ये येऊन विचारू लागले. सतत हा प्रकार ५-६ दिवस होता . वन विभागाची संवेदन शिलतेवर प्रश्न उभे करत होते.

त्यावेळी श्री. ए. के निगम साहेब मुख्य वनसंरक्षक धुळे हे होते.

मला फोन आला श्री. निगम सराचा,"पाटील त्या वाघाचे काय केले". मी सांगितले की," मला माहित नाही. मी निवडणूक ड्युटीमध्ये होतो. श्री . पाडवी साहेबाना विचारून सांगतो". ते मला म्हणाले," तुम्ही तपास करा, श्री. पाडवी काही करणार नाही,मी त्यांना काल बोलावले होते.काय झाले ते मला लगेच कळवा".

मी पाडवी साहेबाना भेटलो, तर ते मला म्हणाले की, "सर्व कागतपत्र मी वाइल्ड लाइफ डिविजनकडे पुढील चौकशी

कामी पाठवले आहे . काल मी निगम सरांना भेटून आलो”. मी डोक्यावर हाथ मारून घेतला आणि पुन्हा फोन केला आणि या वाइल्ड लाईफ शेड्युल एक मधील प्राण्याचे तपास करण्याचे अधिकार सहाय्यक वन संरक्षक यांना आहेत. त्यांनी नाशिक येथे दस्ताऐवज पुढील कार्यवाही साठी पाठवले आहेत. ते हसले आणि फोन खाली ठेवून दिला.

अर्ध्या तासात श्री पाडवी हे माझेकडेस आले,”मला म्हणाले पाटील साहेब, मी काही वन्य प्राणी यांचे गुन्हे हाताळले नाहीत. तुम्ही मला मदत करा”. मी पाडवी साहेबाना वाइल्ड लाइफ प्रोटेक्शन अ‍ॅक्ट मध्ये त्यांनी केलेल्या चुका सांगितल्यावर ते चांगलेच घाबरून गेलेत. “मी सर्व कागदपत्र तयार करतो तुम्ही सह्या करणार असाल तर मी पुढें जातो”. ते मला मोठ्या मनाने म्हणाले, “पाटील साहेब मी सर्व कागदावर डोळे लाऊन सह्या करेल”.

प्रत्यक्ष दर्शनी वनविभागाचा बिबट मारला गेला असा एकही साक्षीदार नव्हता. कोणी सांगणारे देखील नव्हते. माझ्या २० वर्षाच्या सेवेत अशी संवेदनशील अपराधी कोण? हे मोठे प्रश्न चिन्ह होते. अश्या गुन्हा मध्ये खूप कस लागतो आणि फार प्रयत्न करावे लागतात. पाडवी साहेबांचा बिबट आता माझ्या पाठीमागे लागला.

मी धुळ्याला आलो. श्री. वसंतराव ठाकरे यांचे घरी गेलो. त्यांना घटना आणि माझा प्लान सांगितला.

त्याच दिवशी त्यांना भगवा नेहरू शर्ट शिवून घेतला . हे वृक्षमित्र आणि मानद वन्यजीव रक्षक होते. हे हिरव्या रंगाचे नेहरू शर्ट घालत असत. त्यांना भगवा बनवला मी. भगवी लुंगी माझे कडेस असलेली रुद्राक्ष माळ घालून धुळे येथून माझेकडे असलेली खाजगी निळ्या रंगाची मारुती800 ने सकाळी 10 वाजेपर्यंत मी ड्रायव्हर असा बहुरूपी नेला. त्यांना प्लॅन सांगितला होता.त्या प्रमाणे अगदी चोख काम केले.

गावात मध्यभागी मंदिराजवळ गाडी थांबवली. ठाकरे बाबा मंदिरात गेले.बम,बम भोलेनाथ करत महाराज मंदिरातून निघत असताना, एकाने ठाकरे ना विचारले, “महाराज कहासे आये”?

“बेटा हम उज्जैन से आये है “. पानाच्या आणि चहाचे टपऱ्या मंदिरालगत होत्या . महाराज बाहेर आल्यावर ,” महाराज बिडी, सिगारेट लेंगे क्या?” बच्चा, मै धूम्रपान नहीं करता”, महाराज म्हणाले. पानीकी बॉटल एकाने महाराजांना दिली, दुसरा म्हणाला, “महाराज चाय, कॉफी पीओ” खेड्यातली माणसे किती धार्मिक आणि साधू संताना मान देतात,त्यांचा आशीर्वाद कसा मिळेल? ह्या भाबड्या आशेने असतात हे पण मी पाहिले.

बाबानी त्या ठोल्या, रिकामे १५-२० जणांजवळ आपले मस्त बस्तान बसवले. त्यांचे हाथ पाहायला सुरुवात केली. भविष्याच्या हातावरील रेषा कुडमुड्या ज्योतिष बाब सारखे सांगू लागले. बाबाचा आणि माझा चहा पिऊन झाल्यावर “तुम्हारे गावपर बडा संकट आनेवाला. तुम लोगोने गावमे ये ८-१० पीछेके दीनोमे माता चंडिका दुर्गादेवी का वाहन शेरको मार डाला हैं” असे सांगताच त्या सर्वाचा बाबावर खूप विश्वास बसला. बाबांनी डोळे लावले डोळ्यासमोर हाथ धरला. “मुझे बहोत सारे लोग दिखाई दे रहे हैं “ बाबांची महाभारतातील संजय दृष्टी जागे झाली.

बताओ बचे कैसे हुवा ये ? गावातील कोणी? काय? कसे केले? घटनास्थळ जेथे मारला गेले तिथे जाऊन अ‍ॅक्शन सह सांगितले. त्यात एकाने सांगितले की, श्री. रामसिंग गिरासेचे ट्रॅक्टर ने आणले. मंदिर बनाना पडेंगा.एकाने बाबांचा मोबाईल नंबर मागून घेतला. बाबांनी तो हसत हसत खरा नंबर दिला.

हा उपाय सांगून मी आणि बाबा गाडीत बसलो. बाबानी निरीक्षण कुटीमध्ये कपडे बदलले. जेवण करून बाबांना धुळ्याला रवाना केले.

आता अपराधी यांना पकडायचे कसे? म्हणून प्लॅन मी तयार केला. रात्री नऊ वाजता ट्रक ड्रायव्हर, रेंज स्टाफ, पाडवी साहेब यांना मी सांगितले की, “आपल्याला कोपर्ली ला जायचे आहे”. खाकी शर्टवर साधा लांब बाह्यांचा शर्ट प्रत्येकाला घालायला लावला. मी एकटाच रामसिंग गिरासे यांचे राहते घर कोठे आहे असे विचारत ट्रॅक्टर ड्रायव्हर कोठे आहे, गाडी फसली आहे टोचण लाऊन काढायची आहे. तो पिक्चर टाकीमध्येआहे म्हणून समजता, पिक्चर टाकीमध्ये गेलो. साडे दहा वाजले होते. तिथे पत्राचे बंद खोलीत वीसीआरवर हिंदी पिक्चर सुरू होता. त्याला आवाज दिल्यावर तो आला. त्याला टोचन, पैश्याचे आमिष दाखवून बाहेर आणले. जीपमध्ये टाकले आणि गावापासून ३-४ किलोमीटर अंतरावर आणून त्याला चौदावे रत्न दाखवल्यावर पटापट नावे सांगू लागला. ट्रक गावाबाहेर उभा ठेवला होता. त्याचे नाव सांगणे प्रमाणे २५-३० लोकांना घरी जाऊन झोपेतून उठवून आणले. प्रत्येक स्टाफकडे एक एक अपराधी देत देत रात्रीचे ३ वाजेपर्यंत सर्व कार्यक्रम पूर्ण केला. पुन्हा ५ वाजेपर्यंत ५-६ जण ताबेत घेतलेत. सकाळपासून त्यांचे जबाब लिखाण मी करत होतो. घटना अशी घडली होती.

समशेरपुर कोपर्ली रस्त्यावर कोपर्ली गावापासून पच्चीम दिशेला २ ते ३ किलोमीटर अंतरावर रस्त्याला लागुन असलेल्या छोट्या टेकडीवर एका व्यक्तीला हा वाघ दिसला. तो मोटरसायकल ने येत होता कोपर्ली गावाकडे त्याने गावात ही बातमी दिली गावातून पुरुष माणसे हुल्लड बाजीने वाघ पाहायला निघाले. ह्या हल्लागुल्लात कोपरलीचा रिक्षावाला लोकांना वाहतूक करून घटनास्थळी येत होता. त्याचा वाहतूक धंदा सुरू होता. लोकांना पाहिल्यावर बिबट सिमेंट पाइप असलेल्या नाल्याचे पुलाखाली गेला. ही बातमी कोपर्ली आऊट पोस्टचे हवालदार आणि कॉन्स्टेबल यांना समजली. ते ही मोटर सायकल ने आले.पोलिस यांनी लोकांना सांगितले की, “आपण वाघ पकडू. आपल्याला बक्षीस मिळेल. वन विभागाची योजना आहे”. मग एकाने सुचवले की, पाइपला एका बाजूला जाळ लावा म्हणजे बाहेर निघेल.एकाचे सुपीक डोक्यात कल्पना आली की, आपले गावातील वडार बोलवा. ते फास टाकतील हा वाघ पाइपमधून बाहेर आल्यावर. पोलिस दादाचे सांगण्यावरून रिक्षावाला गावात गेला. त्याने जूने रिक्षाचे टायर आणले. ५-६ वडार यांनी फास आणले. टायर पेटवले. रिक्षाचे पेट्रोल काढून एका बाजूने पेटऊन आणि धुराने तो दुसऱ्या टोकाला आल्यावर त्याला फास टाकून पकडला. वडार यांनी फासात अडकल्यानंतर तो झटपट करू लागला. वडारच ते कसले सोडतात वाघाला ? असहाय वाघास वर ओढले, फास घट्ट आवळत गेला. तडफडत वाघ पाय हलवत होता. अत्यंत निष्ठुरपणे शिकार झाली हो. ट्रॅक्टर ड्रायव्हर शेतावर

वखरटी करून येत असताना पोलिसने थांबवले आणि कल्टीवेटरला बांधून वाघ पोलिस आऊटपोस्टसमोर टाकून दिला.
निसर्गनिर्मित अनमोल रत्न अनंताचे प्रवासाचे दिशेला निघून गेला!!!!!! काय केले होते वाघाने ह्या रानटी माणसांचे.
५०-६० अपराधी यांना कोर्टात आणले. एफ.सी.आर, एम. सी.आर झाला. पोलीस यांनी सत्र न्यायालय मध्ये अटक पूर्व जामीन साठी अर्ज केला.आम्ही कोर्ट मध्ये म्हणणे मांडून दर्दनाक शिकारीचे तोंडी मांडणीचे म्हणणे लेखी सह मांडले. तारीख पुढे दिली गेली. ट्रॅक्टर जप्त झाले. पोलिस यांची वन क्षेत्र कार्यालय मध्ये हजेरी लागलीदोन दिवसांनी. दोन महिने.कोर्टात फिर्याद फक्त तांत्रिक पुरावे, रबर टायर जाळले त्याचे ताराचे रिंग आणि फासे आणि पोस्ट मार्टेम रिपोर्टवर अवलंबून होती. दुसरे दिवशी ५०० ते ६०० लोकांचा मोर्चा वन क्षेत्रपाल कार्यालावर आला. पोलिस यांची पिंजरा मोठी गाडी बोलावून घेतली. त्यांचे सह्या घेऊन त्यांना शांत केले आणि त्यांचेबद्दल न्याय दंडाधिकारी वर्ग कोर्टात अर्ज दिला की, हे देखील यात सहभागी आहेत म्हणून. त्यांना समन्स काढून सह आरोपी आहेत म्हणून समन्स करण्याची विनंती केली. त्यांनी समन्स काढले. आरोपींची संख्या वाढली.

४ दिवसांनी नंदुरबारच्या जेष्ठ वयोवृद्ध स्वातंत्र सैनिक श्रीमती. कमलाताई मराठे माझे कार्यालयात कोपर्लीची शिकार बाबत ४० ते ४० कार्य कर्ते बरोबर आल्यात. इकडे पोलिस आणि गावकरी यांचे भांडण सुरू झाले. फिर्याद कोर्टातून काढून घ्या, असे मला सांगू लागल्यात. मी त्यांना सुचवले की, ह्या शासनाचे शक्ती आहेत.एक पत्र वन मंत्री यांचे आदेशाचे घेऊन या. फिर्याद कडून घेऊ. फिर्याद दिली गेली होती तारीख पे तारीख सुरू झाली. एक जरी अपराधी आला नाही तरी, केस पुढे जात होती. महिन्यातून एक, दोनदा तारीख पडली तरी प्रत्येकाचे प्रत्येक तारखेला २०० ते ३०० रुपये भाडे, चहा, जेवण, नाश्ता मध्ये जात. कोर्ट ३ वाजेनंतर तारीख देत असत. आम्ही आणि ते कोर्टात आल्यावर, "आला कोपरलीचे वाघ" असे असे वकील आणि कर्मचारी म्हणत होते. श्री. एन. आर. प्रवीण साहेबांची बदली झाली आणि नंतर श्री. किरण वानखेडे साहेब उप वन संरक्षक आलेत.

योगायोग बघा एके दिवशी आर एफ ओ मीटिंग सुरू असतानांचे वेळेस शहादा येथे तत्कालीन मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांचा फोन आला. ते ह्या वाघाचे केसबद्दल त्यांना विचारू लागले. त्यांना काही माहीत नव्हते. मला सांगितले, हा मंत्री साहेबांचा फोन घ्या. मला मंत्री साहेबांनी विचारले तुम्ही कोण? मी,नाव हुद्दा सांगितले. त्यांनी मला सांगितले की, कोपर्लीचे लोकांविरुध्दची केस कोर्ट मधून काढून घ्या, असे मी आदेश देत आहे. मी त्यांना सांगितले की,"सर मी तुम्हाला पाहिलेले नाही. आपण मला ओळखत नाहीत. माझी आपणास विनंती आहे की, आपण शासन आहात. आपण काही ही आदेश दिले तर आमचेसाठी शिरसावंद्य आहेत. पण लेखी आदेश पाठवा म्हणजे मला कोर्ट मध्ये अडचण येणार नाही". वन मंत्रांचे काही आदेश आले नाहीत. कोर्ट केस पांच सहा वर्ष चालली.
कोर्टाने Wildlife Protection Act मधील सेक्शन 50(3A), "any officer of a rank not inferior to that of an ACF ........ आणि (4) any person detained, or things seized under the foregoing power shall forthwith be taken before a magistrate to be dealt with according to law. आणि प्रत्यक्ष दर्शनी पुराव्याचे इंडियन एविडन्स ॲक्ट मधील तरतुदी नमूद करून आरोपींना पोलीसांसह निर्दोष सोडले.
आम्ही बिबटची झालेल्या शिकारीत त्याचे आत्म्यास न्याय देऊ शकलो नाही. ही मात्र खंत कायमची राहून गेली.

नंतर ठाकरे बाबांना कोपर्ली येथून फोन येत होते की, "बाबा, तुम्हारी भविष्य वाणी सही निकली शेरके केसमे पुरा गाव संकट मे आ गया है । इधरको फेरी होंगी तो आ जाना। मंदिर बनाना है शेरका". बाबा काही गेले नाही कोपर्लीला आणि मंदिर काही बनले नाही. नंतर कळाले की गावातील एकाने मंदिर साठी पैसे गोळा केले आणि खाऊन गेला.

## सुटकेचा निश्वास

**लेखक: पी. के. कुलकर्णी,**

डहाणू वनप्रकल्प विभागात वनक्षेत्रपाल म्हणून कार्यरत असतांनाची ही आठवण.१९९८ ते २००४ या कालावधीत चलनी वनक्षेत्रात मी वनक्षेत्रपाल म्हणून कार्यरत होतो. त्यावेळेस OWR (Over Wood Removal) अंतर्गत साग निष्कासन व रोपवनाची प्रमुख कामे सुरू होती. विशेष म्हणजे त्या अंतर्गत झालेली सर्वच साग रोपवने उत्कृष्ट झाली होती. त्याच सुमारास पदोन्नतीचे वारे वाहत होते. मुलांच्या शिक्षणासाठी माझे कुटुंब कल्याण येथे वास्तव्यास होते. मुलांच्या शिक्षणाचे १० वी व १२ वर्ष असल्यामुळे ठाणे/डहाणू विभाग वगळता इतर विभागात बदली झाल्यास माझ्यासाठी गैरसोयीचे व अडचणीचे ठरणारे होईल त्या भीतीने मी काळजीत होतो. त्याच सुमारास तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ श्री.जे. एन. सक्सेना व प्रादेशिक व्यवस्थापक श्री ए.आर.चड्डा यांनी कक्ष ३०१ मधील २००२ च्या नंतरच्या वर्षाच्या साग रोपवनास भेट दिली. साग रोपवनातील रोपांची ऊंची व वेढी चंद्रपूर/नागपूर येथील साग रोपवनाच्या तुलनेत लक्षणीय जास्त असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदववले. नंतरच्या वर्षातील साग रोपे जवळपास १४-१५ सेमी वेढीची व ७ ते ८ फुट ऊंचीची एकसारखी होती. उत्तम जेनेटिक बियाणे, रूट ट्रेनर तंत्रज्ञान, समाधान कारक पाऊस, मजूर उपलब्धता तसेच वेळच्यावेळी केलेली गुणवत्तापूर्ण वन संवर्धनात्मक कामे ही त्या यशस्वी रोपवनाची पांचसूत्री असावी. साग रूट ट्रेनर व साग स्टम्पच्या तुलनेत साग रूट ट्रेनर रोपांची ऊंची / वेढीची वाढ सुरवातीच्या कालावधीत निश्चितच जास्त असल्याचेही त्यावेळेस दिसून आले होते. महोदयांनी त्या साग स्टंप व रूट ट्रेनर ऊची/वेढीची विश्लेषणाबाबत टिप्पणी तयार करण्याच्या सूचना दिल्याप्रमाणे मी अहवाल तयार केला. दोनचदिवसांनी माझी पदोन्नती होऊन माझी पदस्थापना पुन्हा डहाणू विभागात झाल्यामुळे मी सुटकेचा निश्वास टाकला. त्या रोपवनामुळेच मला इतरत्र बदली होण्याचा संकटापासून वाचववले ही माझी धारणा पक्की झाली. त्या रोपवनाचे फोटो व अहवाल अजूनही मी सांभाळून ठेवलेआहे.

त्यातील छायाचित्र क्र.३ मधील दोन ऊंच साग रोपांना क्षेत्रीय कर्मचा-यांनी राम व लक्ष्मणाची उपमा दिली होती.

| Compartment & Plantation Year | 301('02) | 411('02) | 379('04) | 300('04) | 183('04) |
|---|---|---|---|---|---|
| **Seed Source | C.N.(168/169) Devzari | C.N.(168/169) Devzari | C.N.(77) Zari | C.N.(77) Zari | C.N.(77) Zari |
| Height(cm)(Teak RT) | 255 | 180 | 73 | 135 | 158 |
| Girth(mm)(Teak )RT | 146 | 66 | 70 | 110 | 148 |
| Height(cm)(Teak Stump) | 170 | 130 | 50 | 105 | 102 |
| Girth(mm)(Teak Stump) | 108 | 42 | 57.5 | 98 | 110 |





**दुसरी आठवण**

**सागाच्या पानाची अचंबित करणारी लांबी १०५ सेमी**

**लेखक: पी. के. कुलकर्णी,**

वन ववकास महामांडळातील डहाणू वन प्रकल्प ववभागात सहाय्रक व्रवस्थापक म्हणून कार्यरत असतांना रोपवन पहाणीचे वेळी आढळलेला अभूतपूर्व लांब सागाचे प्रथम वर्ष रोपवनातील साग रूट ट्रेनर रोपाच्या एका सागाच्या पानाची लांबी १०५ सेमी व रुंदी ६२ सेमी. अशीअचंबित करणारी होती. एव्हढी लांबी रुंदीचे सागाचे पान असण्याची ही घटना निश्चितच दुर्मिळ असावी. **(Google search revels that length in Teak young seedling is maximum 100cm)**

## मानव–वन्यजीव संघर्षातील शौर्यः एका बिबट्याला पकडण्याची मोहीम

**लेखक : विशाल आशा अशोक सालकर, वनपरिक्षेत्र अधिकारी, शहापूर वनविभाग,**

**प्रस्तावना-**

जेव्हा जंगल आपला श्वास रोखतं, तेव्हा गावाचं हृदय धडधडू लागतं. त्या दिवशीही असंच झालं. सूर्य डोक्यावर तळपत होता. उन्हाळ्याची सुरुवात होती. दुपारचं तापमान चढलेलं, वातावरणात ताण दाटलेला. एक बिबट्या आपलं रान हरवून माणसांच्या वस्तीच्या रस्त्यावर उतरला होता. गावकऱ्यांच्या नजरेत प्रश्नचिन्हं, पायाखाली असुरक्षितता.मी, वनपरिक्षेत्र अधिकारी, सिंदेवाही (प्रादेशिक) म्हणून कार्यरत असताना, वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्षाची पुन्हा एकदा अनुभूति घेतली. मी वाघ–बिबट्या जेरबंद करण्याच्या मोहिमा याआधीही पार पाडल्या होत्या, पण या क्षणात प्रत्येक अनुभव छोटा वाटत होता. ही फक्त एक मोहीम नव्हती तर भीतीवर विजय मिळवण्याची खरी परीक्षा होती.

*“वनं हि धनं प्राणिनां, रक्षणं तु मानवानाम्”*

*(वन हे सर्व जीवांचे धन आहे; त्यांचे रक्षण करणं ही मानवाची जबाबदारी.)*

**घटनेची सुरुवात**

८ फेब्रुवारी २०२५. उन्हाळ्याची दुपार. गावावर जणू उष्णतेसोबत भीतीचं सावट पसरलं होतं. गावातील जयश्री रवी शेंडे या आपल्या घरातील काम उरकून शेतात फेरफटका मारायला निघाल्या. देऊळ तलावाजवळच्या शिवारात पोहोचताच अचानक बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. अचानक झालेल्या हल्ल्याने त्या ओरडू लागल्या, आणि त्यांचा आक्रोश कानावर पडताच नजीकचे काही लोक त्या दिशेने धावले. गोंधळून गेलेला बिबट्या गावाच्या दिशेने शिरला. थोड्याच वेळात सुषमा देवानंद बन्सोड आणि त्यांचे पती देवानंद सितकुरा बन्सोड या दाम्पत्यावरही त्याने घरात घुसून हल्ला केला. त्यांच्या किंकाळ्यांनी संपूर्ण वस्ती हादरली. इतक्यात जवळचे चंद्रभान पांडुरंग बन्सोड यांनी आवाज ऐकून धाव घेतली, पण बिबट्याने त्यांनाही जखमी केलं. रक्त वाहू लागलं, गावात हाहाकार झाला. चार जण जखमी झाले होते. गावकऱ्यांनी तत्परतेने रुग्णवाहिका बोलावून सर्वांना उपचारासाठी दवाखान्यात रवाना केलं.दरम्यान, मला भ्रमणध्वनीवर ग्रामस्थांकडून घटनेची माहिती मिळाली. उपलब्ध आणि आवश्यक साहित्य घेऊन

मी माझ्या काही सहकाऱ्यांसह घटनास्थळी तात्काळ रवाना झालो.

परिस्थितीचं गांभीर्य व ध्येय स्पष्टता

गावात पोहोचेपर्यंत वातावरणात भीतीचं सावट गडद झालं होतं. घटना वाऱ्यासारखी पसरली होती. ज्या घरात बिबट्या लपला होता, ते दरवाजा नसलेलं, पडके आणि कुणीही राहत नसलेलं घर होतं. कवेलू सुद्धा मोडकळीस आलेले आणि घराची संरचना खराब अवस्थेत होती. समोरची जागा अरुंद आणि शांत, अंधारमय असल्यामुळेच बिबट्याने ते आसऱ्यासाठी निवडलं असावं.

त्यावेळी, मी ब्रम्हपुरी वनविभागाचे माझे वरिष्ठ अधिकारी, श्री. बी. आर. वरुण, उपवनसंरक्षक (प्रभारी) आणि श्री. महेश चोपडे, सहाय्यक वनसंरक्षक यांच्याशी भ्रमणध्वनीवर चर्चा केली. मोक्याची परिस्थिती, घटनास्थळी सुरक्षा, गावकऱ्यांचं रक्षण आणि पुढील आदेश यावर त्यांनी मार्गदर्शन दिलं.ध्येय स्पष्ट झालं होतं - बिबट्या जेरबंद व्हायलाच हवा.

तातडीने आम्ही नायलॉनच्या जाळ्या आणल्या. डिफेन्डर, इलेक्ट्रिक स्टिक, फायबर स्टिक सज्ज केली. काही वेळातच अतिरिक्त कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. सर्वांच्या नजरा एकाच दिशेला रोखल्या होत्या—त्या अंधारमय घरात, जिथे एक अदृश्य सावली दबा धरून बसली होती.

" एका बाजूला वन्यजीवाचं चपळ रूप,
आणि दुसऱ्या बाजूला माणसाचा थरथरता श्वास "

या दोन टोकांना बांधणारी दोरी म्हणजे आमची कर्तव्यनिष्ठता.

शौर्यकाळ

घराभोवती जाळ्या लावण्याचं काम सुरू होतं.



अंधारमय, अरुंद घरातल्या उन्हाळ्याच्या दाहक शांततेला फक्त एकच आवाज भेदून जात होता, बिबट्याचं गुरगुरणं!

तो आवाज कानावर पडताच अंगावर शहारे उठत होते. निरीक्षणात दिसलं की घरावर कवेलू आहे. कवेलू खाली बांबूची लादणी मोडकळीस आलेली होती आणि त्यावरून बिबट वर चढून बाहेर फोडत निसटू शकतो. त्यामुळे त्या भागावर तातडीने मजबूत जाळं चढवावं लागलं. दोन्ही दरवाजे खुले होते आणि बिबट ज्या वाटेने आत शिरला, त्याच वाटेने बाहेरही झेप घेईल, याची पूर्ण कल्पना होती. दरवाज्याजवळील प्रत्येक कर्मचाऱ्याला सतर्क राहण्याचे निर्देश दिले. मी निवडक सहकाऱ्यांसह तेथे उभा राहून क्षणाक्षणाला परिस्थितीवर नजर ठेवत होतो.

अचानक, गडगडाटासारखा आवाज करत बिबट्याने झेप घेतली. क्षणातच तिथे उभे असलेले वनरक्षक नितेश शहारे सजग झाले. काठी आणि डिफेन्डरचा आधार घेत त्यांनी बचावाचा भक्कम भिंत उभी केली, पण बिबट्याचा धारदार पंजा नायलॉनच्या जाळ्यातून आरपार शिरून त्यांच्या हातावर आदळला. एका क्षणातच नख लागून जखम झाली, रक्त धारासारखं वाहू लागलं. वेदना असह्य होत्या, तोल जात होता, तरीही त्यांनी जाळी सोडली नाही. तो क्षण म्हणजे शौर्याचं मूर्त रूप होता. त्यांची निष्ठा आणि चिकाटी संपूर्ण पथकासाठी प्रेरणादायी ठरली. मी आणि माझे सहकारी बाजूच्या दरवाज्याजवळ डिफेन्डर धरून जाळी घट्ट करत होतो. बिबट्याने आमच्या दिशेने झेप घेतली, पण संयमाने उभे राहिलो आणि जाळी व डिफेन्डरचा आधार घेत त्याचा हल्ला परतवून लावला. मराठी कवी विनायक मंगेश करंदीकर यांच्या ओळीत सांगायच झाल्यास,

*" अंधारातही प्रकाशाची वाट शोधली,*
*संकटातही मनाला आधार दिला,*
*प्रत्येक क्षण जिंकण्यासाठी सामर्थ्य वाढवलं,*
*साथ देणाऱ्यांची साथ जाणवली."*

जेरबंद क्षण

बिबट्याचे सलग हल्ले परतवून लावले गेले होते, पण त्याचा आक्रोश वाढत होता. प्रत्येकजण तणावाखाली होता. आम्हाला माहीत होतं की या क्षणी जास्त हालचाल म्हणजे नवीन धोक्याला आमंत्रण. त्यामुळे, आम्ही बिबट निसटणार नाही याची खबरदारी ठेवत सजग राहिलो. त्यावेळी, RRT ताडोबा येईपर्यंत बिबट निसटणार नाही याची खबरदारी ठेवत सजग राहणे आवश्यक होते. तो वेळ अतिशय लांब वाटत होता. बिबट अधूनमधून झेप घेत होता आणि गुरगुरणं तीव्र होत होतं, पण आम्ही डिफेन्डर आणि जाळ्यांचा आधार घेत सावधपणे त्याला रोखून ठेवत होतो.अखेर, ताडोबाहून प्रशिक्षित RRT पथक दाखल झाले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे यांनी औषध तयार केलं आणि शार्प शूटर अजय मराठे यांनी नेम साधला. क्षणभर हवेत शीळ उमटली. ट्रँक्विलायझरचा डार्ट बिबट्याच्या मांडीवर अचूक लागला. तो काही क्षण गुरगुरला, उड्या मारल्या आणि हळूहळू बेशुद्ध होऊ लागला. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला सुरक्षितपणे स्ट्रेचरवर ठेवून पिंजऱ्यात हलवलं. गावात एकच सुस्कारा उमटला, भीती संपली, संकट टळलं.

समारोप

या मोहिमेत पाचही जखमींवर वेळेवर उपचार झाले आणि सुदैवाने कुणीही चिंताजनक नव्हते. बिबट्याला TTC, चंद्रपूर येथे सुरक्षितपणे हलविण्यात आलं. या मोहिमेत

ब्रम्हपूरी वानविभागाचे माझे वरिष्ट श्री. बी. आर. वरुण, उपवनसंरक्षक (प्रभारी) आणि श्री. महेश चोपडे, सहाय्यक वनसंरक्षक, जखमी होऊनही कर्तव्यनिष्ठ राहिलेले वनरक्षक नितेश शहारे, सिंदेवाही परिक्षेत्राचे मोहिमेत सामील असलेले सर्व कर्मचारी, RRT पथक ताडोबा आणि RRU पथक सिंदेवाही, पोलीस प्रशासन व आरोग्य विभाग सिंदेवाही यांचं मोलाचं सहकार्य लाभलं. अनुभवी वनपाल श्री. एस. बी. उसेंडी यांनी पथकाला मार्गदर्शनासोबत संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांना साथ लाभली महिला वनरक्षक माधुरी सुरपाम यांची, ज्यांनी स्थानिक महिलांशी संवाद साधत गावात शांतता आणि धीर टिकवून ठेवण्याचं काम केलं. या दोघांच्या सहकार्यामुळे मोहिमेचं समर्पित संचालन शक्य झालं.



वनकर्मचाऱ्यांनी जीव धोक्यात घालून फक्त बिबट्याचं रक्षण केलं नाही, तर गावकऱ्यांचा जीव, विश्वास आणि आशाही जपली. ही मोहीम आपल्याला शिकवते की संघर्ष कितीही कठीण असो, एकत्र राहून, शांतपणे आणि संयमाने त्यावर मात करता येते. मानव–वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी सहजीवन, जनजागृती, समन्वय, संयम, सतर्कता, योग्य उपचार, तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर आणि जबाबदारीची जाणीव आवश्यक आहे. प्रत्येक व्यक्ती आणि समुदायाने योग्य मार्गदर्शनाचे पालन करून संयम आणि सहकार्य दाखवल्यास, मनुष्य आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष सुरक्षितपणे आणि सकारात्मक पद्धतीने हाताळता येतो.

## हृदयस्पर्शी....

वडापाव विकणारा राजू ट्रेनच्या मागे पळत होता. त्याच्या छोट्या हातात वडापाव घट्ट पकडलेला होता.ट्रेन सुटताच त्याने ट्रेनमधल्या एका माणसाला तो वडापाव विकला.
दोघांचीही घाई झाली – एकाला पैसे द्यायचे, दुसऱ्याला पैसे घ्यायचे होते.राजू अजून ट्रेनच्या मागे पळत हात पुढे करत होता,तो माणूस दारात उभा राहून खिशातून पैशांचे पॉकेट काढत होता.गाडीने वेग घेतला,राजू मागे राहू लागला..
क्षणभर त्या माणसाच्या मनात आले –"आता पैसे देऊन काय उपयोग... जाऊदे, नको द्यायला!"मनात थोडी कपटभावना आली.
पण...
पॉकेट परत खिशात ठेवताना चुकून मोबाईल आणि पॉकेट दोन्हीही खाली पडले! तो घाईघाईने पकडायला गेला, पण ट्रेन थोडी वेगाने पुढे गेल्याने शक्य झाले नाही.
पॉकेट व मोबाईल ट्रॅकवर पडून राहिले. त्या माणसाचा जीव घाबरला – त्यात प्रवासाचे पैसे, खर्चाचे पैसे,तिकीट सगळं होतं.तो माणूस कोपऱ्यात जाऊन बसला,शरमेने आणि भीतीने डोळ्यात पाणी आले.शेजारी ठेवलेला वडापावसुद्धा खाण्याची त्याची हिम्मत झाली नाही.

थोडावेळ गेला. गाडी पुढच्या स्टेशनवर थांबली. TC डब्यात चढला. तिकीट तपासणी सुरू झाली. त्या माणसाचा नंबर आला. तिकीट पॉकेटमध्ये होते, आता त्याच्याकडे काहीच नव्हते... विनातिकीट प्रवाशी म्हणून तो पकडला गेला. दंड होणार अशी ट्रेनमध्ये चर्चा सुरू झाली. चार लोकांमध्ये झालेल्या अपमानाने त्याची मान खाली गेली. गडगंज श्रीमंत असूनही, आयुष्यभर समाजात स्वाभिमानाने जगला असुनही आज ट्रेनमध्ये चार लोकांत उभं राहणं त्याला सहन होत नव्हतं. नाइलाजाने कारवाई करण्याची वेळ आली, ट्रेनमधल्या प्रवाशी मित्रांच्यात नाचक्की झाली. अपमानाची आज बारी आली, हे सगळं त्याच्या मनाविरूद्ध चाललेलं होतं,
आयुष्यभर समाजात निस्वार्थीपणे मदत करत आलोय, खूप जणांना चांगला मार्ग दिलाय आणि आज एका साध्या चुकीची शिक्षा इतकी मोठी असु शकते का..? याचा विचार त्याच्या मनात येतो. TC कारवाईसाठी त्याला घेऊन जायला निघतो.. तेव्हढ्यात एक छोटा मुलगा व्हिडियो कॉल वर बोलत त्यांच्या समोर येऊन उभा राहतो. सर्वजण थांबतात.
त्या मुलाच्या हातात एक पिशवी असते. त्यात पॉकेट व मोबाईल असतो. मुलगा ते त्या माणसाच्या हातात देतो.
तो माणूस ते उघडतो –पाकिटात सगळे पैसे आणि तिकीट तसेच्या तसे असतात.
क्षणभर तो नि:शब्द होतो. त्याला काय चाललय काही समजत नाही. त्याच्या डोळ्यातून आपोआप अश्रू येतात.
तो मुलाला मिठी मारतो आणि रडतो. तिथला माहोल गंभीर होतो. एकजण टाळ्या वाजवू लागतो. मुलगा कावराबावरा होतो. सगळेच टाळ्या वाजवू लागतात. काहीवेळ फक्त टाळ्यांचा आवाज घुमू लागतो.त्याच्या हातातल्या फोन वरच्या व्हिडियो कॉलवर राजू ते सगळ बघत असतो.
मुलाला आणि राजूला मनोमन खूप आनंद होतो. तो माणूस TC ला तिकीट दाखवतो. TC हसतो, त्याच्या खांद्यावर हात ठेवतो. आणि काहीही न बोलता पुढे निघून जातो. ---

तो माणूस मुलाला विचारतो, "हे तुझ्याकडे कसे आले?" मुलगा हसत सांगतो, "मी मागच्या डब्यात खेळणी विकत होतो. तुमचे पॉकेट पडलेले माझ्या भावाने पाहिले. त्याने उचलून पिशवीत घालून माझ्याकडे डब्यात फेकले आणि मला व्हिडियो कॉल करून तुम्हाला दयायला सांगितले. त्याचे नाव राजू आहे. त्यानेच तुम्हाला वडापाव विकला होता."

त्या माणसाला अपराधीपणाने पुन्हा रडू येते.
"माझ्या मनात त्याला फसवण्याची भावना आली होती.
पण राजुने आणि तू प्रामाणिकपणा आणि मनाचा मोठेपणा दाखवून माझी सगळी पैश्याची श्रीमंती आणि समाजातली खोटी प्रतिष्ठा याची किंमत शुन्य आहे हे मला दाखवून दिलं.
खोटेपणाला किंमत शून्य असते हे तुम्ही मला शिकवलं बाळांनो..... मला माफ करा.."

त्याने मुलाच्या हातात पॉकेट मधील सगळे पैसे ठेवले. पण त्या मुलाने पैसे घेतले नाहीत त्याला नकार दिला.

दादाने फक्त वडापावचे पैसे घ्यायला सांगीतले आहेत असे सांगीतले. आणि तेव्हढेच पैसे घेऊन तो मुलगा हसत-हसत पुढे निघून गेला.
टाळ्यांचा आवाज ट्रेनमध्ये अजूनही स्पष्ट घुमत होता.
आणि त्या पोरांच्या चेहऱ्यावर करोडो रुपये कमावल्याची भावना झळकत होती.
सारांश

आयुष्यात काय मिळवायच आहे..?
पैशापेक्षा मोठा "प्रामाणिकपणा" असतो. प्रत्येक माणसाला त्याचे मन आणि मूल्यं जपता आली पाहीजेत.
विश्वास जपता आला पाहिजे.

•◈•• ••◈••

**शाळेत बाई म्हणाल्या : आपल्या आवडत्या विषयावर निबंध लिहा..एका मुलाने निबंध लिहिला...**

## विषय - दगड

'दगड' म्हणजे 'देव' असतो..
कारण तो आपल्या आजूबाजूला
सगळीकडे असतो.. पाहीलं तर दिसतो..
अनोळख्या गल्लीत तो
कुत्र्यापासून आपल्याला वाचवतो..
हायवे वर गाव
केव्हा लागणार आहे ते दाखवतो..
घराभोवती कुंपण बनून रक्षण करतो..
स्वैयंपाक घरात
आईला वाटण करून देतो..
मुलांना झाडावरच्या
कैऱ्या, चिंचा पाडून देतो..
कधीतरी आपल्याच डोक्यावर बसून
भळाभळा रक्त काढतो आणि
आपल्या शत्रूची जाणीव करून देतो..
माथेफिरू तरुणांच्या हाती लागला तर,,
काचा फोडून त्याचा राग शांत करतो..
रस्त्यावरच्या मजुराचं
पोट सांभाळण्यासाठी
स्वत:ला फोडुन घेतो..
शिल्पकाराच्या मनातलं
सौंदर्य साकार करण्यासाठी
छिन्निचे घाव सहन करतो..
शेतकऱ्याला
झाडाखाली क्षणभर विसावा देतो..
बालपणी तर स्टंप, ठिकऱ्या, लगोरी अशी
अनेक रूपं घेऊन आपल्याशी खेळतो..
सतत आपल्या मदतीला
धावून येतो, देवा'सारखा..
मला सांगा,,
'देव' सोडून कोणी करेल का
आपल्यासाठी एवढं ??
बाई म्हणतात -
तू 'दगड' आहेस,, तुला गणित येत नाही..
आई म्हणते - काही हरकत नाही,,
तू माझा लाडका 'दगड' आहेस..
देवाला तरी कुठे गणित येतं ! नाहीतर
त्याने फायदा-तोटा बघितला असता..
तो व्यापारी झाला असता."
आई म्हणते -
दगडाला शेंदुर फासून त्यात भाव ठेवला की,,
त्याचा 'देव' होतो म्हणजे, 'दगड' च 'देव' असतो ~

## वेधक वृत्त

## नवीन सदस्य

१) श्री. नितीन काकोडकर,सेनि प्रधान मुख्य वन संरक्षक, हे सेवक संघ पुणे शाखेत आजीवन सदस्यत्व स्विकारले आहे.
२) श्री. मधुकर शंकर राजपूत, सेवानिवृत्त वन क्षेत्रपाल,चाळीसगाव, जि. जळगाव, हे सेवक संघ धुळे शाखेत नविन आजीवन सदस्यत्व स्विकारले आहे.
(३) श्री. राजेंद्रनाथ भिका शेटे, सेवानिवृत्त वन पाल, शिरपूरजि. धुळे, हे सेवक संघ धुळे शाखेत नविन आजीवन सदस्यत्व स्विकारले आहे.
त्यांचे संघ परिवारात अभिनंदन,

**वाचक प्रतिक्रिया**

## सेवक वार्ता, सप्टेंबर-२०२५ वाचक प्रतिक्रिया

* नेहमीप्रमाणे सप्टेंबर २०२५ चा सेवक वार्ता अंक रसभरीत व चवदार झाला आहे. - व्ही. टी. पत्की

*श्री राहुल मराठे यांचे बाबत उत्कृष्ट माहिती, क्षणभंगुर अप्रतिम. वेळेत सातत्याने अंक प्रकाशित केलेबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. –विठ्ठल धोकटे

*नेहमीप्रमाणेच संग्राह्य! - आर.के. आडकर

*काम लाजवाब . सुंदर रंगीबेरंगी रानफुले अशीच असतात गवळी सरसारखी. आसमंत फुलवून सुगंधित करून टाकतात. –जयप्रकाश पाटील

* आदरणीय प्रकाशक, सर्व चमु, श्री कर्णधार सर,अन् सुंदर समयोचीत कौतुक, अभिष्टचिंतन, वार्तांकन, सर्व समावेशक! भावपूर्ण श्रद्धांजली. -आर. एम. सोनटक्के

### आयुष्याची वजाबाकी

दुसऱ्यांच्या नजरेनं सुख पाहणारी माणसं आयुष्यभर समाधानी राहू शकत नाहीत, त्यांना नेहमी कोणत्या तरी गोष्टीची कमतरता जाणवतेच. जीवनात हार कधीच मानू नका, कारण पर्वतामधून निघणा-या नदीने आजपर्यंत रस्त्यात कोणालाच विचारले नाही की समुद्र किती दूर आहे. कठीण प्रसंगात न मागता दिलेली साथ नेहमी मोलाची ठरते, जिथे सर्व संपले याची जाणीव होते, तिथे पाठीवर अलगत पडणारा हात देवापेक्षा कमी नसतो.

•◈•• ••◈••

## *निधन वार्ता*



(१) कु. अंकिता वराटे, वनरक्षक, यांचे दि. १/१०/२०२५ रोजी सकाळी ४:०० वाजता निधन झाले. तिच्या आत्म्यास चिर शांती लाभो. अंत्यविधी तिच्या माहेरी मु.घोडदरा तालुका मारेगाव जि.यवतमाळ येथे करण्यात आला. सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली .
(२) श्री. मिथिलेश कुमार शर्मा, से.नि. वन महानिरीक्षक यांचे दि. १५/१०/२०२५ रोजी दुपारी दिल्ली नोएडा येथे अल्पशा आजारपणा मुळे निधन झाले आहे. सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली .
(3) अ. गो. ओक, माजी वन महानिरीक्षक तथा विशेष सचिव, केंद्रीय सरकार, यांचे दि. १४-१०-२०२५ रोजी निधन झाले. त्यांनी महाराष्ट्रात अनेक महत्वाचे पदांवर काम केले होते. त्यात व्यवस्थापकीय संचालक, वनविकास महामंडळ, वन संरक्षक, कोल्हापूर, व शिक्षण व संशोधन, यांचा उल्लेख करावा लागेल. सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६